www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २० ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार २४ मे २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

# डोंबिवलीत भीषण स्फोट! औद्योगिक सुरक्षा वाऱ्यावर, रहिवाशांचा जीव धोक्यात

● ठाणे, यश सावंत :

भीषण स्फोटानं डोंबिवली एमआयडीसी पुन्हा एकदा हादरली. एमआयडीसीमधील अमुदान कंपनीमध्ये (Amudan Chemcal Company) बॉयरचा स्फोट झालाय. या स्फोटात 7 कामगारांचा मृत्यू झाला तर 48 जण जखमी झालेत. स्फोटामुळे 200 मीटर परिसरातील घरांच्या काचा फुटल्याचीही फुटल्या. जवळपासच्या केजीएन केमिकल कंपनी,



मेहता पेंट, सप्त वर्ण आणि ह्युंदाई शोरूममध्येही आग लागली. या स्फोटामुळे परिसरात भीतीचं वातावरण आहे. जखमींना डोंबिवलीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलंय. तर नेपच्यून हॉस्पिटलमध्ये 15 जणांवर उपचार सुरु आहेत.

पान २ वर

## डोंबिवलीत जवळपास 250 कारखाने

■ डोंबिवलीतील औद्योगिक भागामध्ये रायायनिक, टेक्स्टाईल, फार्मा, रबर,प्लास्टिक असे जवळपास 250 कारखाने आहेत. या कारखान्यांमध्ये वेगवेगळे रासायनिक पदार्थ, विषारी वायू नियमितपणे हाताळले जातात तरीही या कारखान्यामध्ये सुरक्षेच्या दृष्टीने विशेष काळजी घेतली जात नाही. या आधीही औद्योगिक विभागातील कंपन्यांमध्ये आग लागून दुर्घटना घडलेल्या आहेत तरीही अद्याप इथल्या बऱ्याच कारखान्यांमध्ये धोक्याची सूचना देणारे अलार्म आणि सेन्सर यंत्रणा सक्रीय नाहीत. त्याचबरोबर आपत्तीकालीन परिस्थिती उद्भवल्यास त्याचा सामना कशाप्रकारे करावा याचे प्रशिक्षण येथील कामगारांना देण्यात आलेले नाही. बहुसंख्य कंपन्या कॉस्ट कटिंगच्या नावाखाली सुरक्षेच्या प्रश्नाकडे दूर्लक्ष करताना दिसतात.

## थोडक्यात




### अटलसेतूवरील महिला कर्मचाऱ्याला दमदाटी; मोटारचालका विरोधात गुन्हा दाखल

● पनवेल, विशाल पाटील :

मुंबई ते उरण या मार्गावरील अटलसेतू पुलाने प्रवास करत असताना अटलसेतूवरील टोलनाका कर्मचाऱ्याला उद्धट बोलल्यास थेट पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद होऊ शकतो. बुधवारी दुपारी पावणेबारा वाजता टोलनाक्यावरील एका महिला कर्मचाऱ्याला शिविगाळ व दमदाटी केल्याने एका मोटार चालकावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अटलसेतूवरुन ४९ वर्षीय हारुण पटेल हे मोटार चालवित असताना अटलसेतू येथील टोलनाक्यावर हर्षदा कोळी या पथकर जमा करण्याचे काम करत असताना ही घटना घडली. हारुण यांनी मोटार न थांबवल्याने त्यांच्या गाडीच्या पुढील बाजूवर बूमबॅगीअर पडले.

पान २ वर

### कोल्हापूरात अनधिकृत होर्डिंगधारकांना दणका; तिघांवर गुन्हा दाखल



● कोल्हापूर, दिगंबर जाधव :

अनधिकृत होर्डिंग उभारणाऱ्यांना कोल्हापूर महापालिकेने बुधवारी दणका दिला आहे.

पान २ वर

## ठाण्यात इव्हीएमच्या स्ट्राँगरुमला तिहेरी सुरक्षा कवच



● ठाणे, विशेष प्रतिनिधी :

ठाणे जिल्ह्यातील तीन लोकसभा मतदार संघाच्या लोकसभा निवडणुकीसाठी शांततेत आणि कोणताही अनुचित प्रकार न घडता मतदान प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीतील उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंदिस्त झाले आहे. ही इव्हीएम यंत्रणा सुरक्षिततेसाठी स्ट्राँगरूममध्ये ठेवण्यात येत असतात. त्यानुसार ठाण्यातील कावेसर येथील न्यू होरायझन शाळेत तयार केलेल्या स्ट्राँगरूममध्ये या इलेक्ट्रॉनिक इव्हीएम मशिन्स ठेवल्या असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि त्याच्या सुरक्षेसाठी केंद्रीय निमलष्करी दल, राज्य राखीव पोलिस यांच्यासह स्थानिक पोलिस असे १२८ पोलीस कर्मचारी तैनात केल्याची माहिती सूत्रांनी दिली. ठाणे जिल्ह्यातील ठाणे, कल्याण आणि भिवंडी लोकसभेसाठी २० मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडली.

पान २ वर

## डीपीएस तलावाचे चोक पॉईंट तोडण्यासाठी आठवड्याचा अल्टिटेम; गणेश नाईक उतरले मैदानात

● नवी मुंबई, भावना जैन :

नवी मुंबईतील नेरूळ येथील ३० एकरांवरील डीपीएस फ्लेमिंगो तलाव स्थलांतरित पक्ष्यांचे निवासस्थान म्हणून पुनर्संचयित करण्याच्या पर्यावरणवाद्यांच्या मोहीमेला भाजपचे आमदार गणेश यांनी मोठे बळ दिले आहे. घाटकोपर येथे एमिरेटसच्या विमानाने दिलेल्या धडकेत ३९ फ्लेमिंगोंचा मृत्यू झाल्यानंतर हळहळलेल्या नाईक यांनी या गुलाबी पक्ष्यांचा अधिवास असलेल्या या तलावाची गुरुवारी पाहणी करून आठवडाभरात त्यात येणारे भरतीचे पाणी रोखणारे चोक पॉईंट तोडण्यासाठी आठवडाभराचा अल्टिटेम दिला आहे. या भेटीत नाईक यांनी आठवडाभरात चोक पॉईंट तोडले



नाहीत तर स्वत्च मैदानत उतरून जेसीबी लावून ते तोडतील, असे सिडकोचे मुख्य अभियंता एन.सी. बायस आणि त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांना स्पष्ट केले. येथील वापरात नसलेल्या प्रवासी वाहतूक जेट्टीवर जाण्यासाठी बांधलेल्या रस्त्यामुळे तलावाकडे जाणारी मुख्य जलवाहिनी गाडली गेली असून त्यामुळे तलाव पूर्णपणे कोरडा झाला आहे. यामुळे अन्न मिळत नसल्याने तो फ्लेमिंगो भरकटत असल्याच्या पर्यावरणप्रेमींच्या आरोपास दुजोरा दिला. तलावातील पाण्याचा प्रवाह रोखून सिडको अधिकाऱ्यांचा त्याच्या ३० एकर भूखंडाचे व्यापारीकरण करण्याचा गुप्त हेतू दिसतो. परंतु, हा कुटील डाव गणेश नाईक यशस्वी होऊ देणार नाही, असा इशारा नाईक यांनी यावेळी दिला. तलाव नष्ट झाल्यास नवी मुंबईची फ्लेमिंगो सिटीची ओळख नष्ट होईल, असे ते म्हणाले. यातील तत्कालिन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी त्यांनी केली.

पान २ वर

## वरातीमागून घोडं; पुण्यात आता मध्यरात्रीनंतर नाकाबंदी, मद्यपी वाहनचालकांवर कारवाई सुरु



● पुणे, अभिजित येरल्लू :

कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर वाहतूक पोलिसांनी मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहतूक पोलिसांनी मुंढवा, कोरेगाव पार्क, येरवाडा, विमाननगरसह शहरातील वेगवेगळया भागात नाकाबंदी करून ८५ मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई केली. मध्यरात्रीनंतर शहरात होणारे अपघात, तसेच मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी आता अचानक नाकाबंदी करण्यात येणार आहे.

कल्याणीनगर भागात रविवारी मध्यरात्री भरधाव मोटारीने दुचाकीस्वार संगणक अभियंता तरुणासह त्याच्या मैत्रीणीला धडक दिली. अपघातात दोघांचा मृत्यू झाला. अल्पवयीन मोटारचालक मुलगा मित्रांसोबत पार्टी करून कल्याणीनगर भागातून निघाला होता. कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर वाहतूक पोलिसांनी मध्यरात्री वाहतुकीचे नियम धुडकावून भरधाव वेगाने वाहन चालविणारे, तसेच मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. वाहतूक पोलीस, तसेच स्थानिक पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनी मध्यरात्री बारानंतर पहाटेपर्यंत शहरातील वेगवेगळया भागात नाकाबंदी केली.

पान २ वर

## लोकशाहीत अल्पसंख्याक समुदायांना समानन्याय आवश्यक..

अमेरिकी राजदूत एरिक गार्सेटी यांचे मत



● मुंबई, विशाल कारंडे :

लोकशाही व्यवस्थेत अल्पसंख्याक समुदाय आणि संप्रदायांसह समाजातील सर्व घटकांत आपल्याला समान वागणूक मिळत असल्याची भावना असणे अत्यावश्यक आहे. विविधता, सर्वसमावेशकता, समानता, सुगमता ही तत्वे फक्त निवडणुकीचा भाग असू नयेत तर ती सर्वकाळ असावित. सार्वमत हा लोकशाहीचा पाया आहे, अशा आशयाचे मत अमेरिकेचे भारतीय राजदूत एरिक गार्सेटी यांनी बुधवारी व्यक्त केले. सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योगांमधील मनुष्यबळ रचनेत सर्व स्तरावरील सर्वसमावेशकता आणि विविधतेचे संवर्धन करण्यासाठी अमेरिकी दूतावासातर्फे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमात सहभागी उद्योजकांशी संवाद साधल्यानंतर गार्सेटी यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी भारतातील निवडणुकांदरम्यान दिसणाऱ्या सामुदायिक ध्रुवीकरणाचा भारत आणि अमेरिका यांच्यातील परस्पर संबंधावर काही परिणाम होऊ शकतो का याबाबत विचारले असता गार्सेटी यांनी वरील वक्तव्य केले.

पान २ वर

## वृक्ष प्राधिकरण विभागाच्या गलथान कारभाराचा ठाणेकरांना फटका

● ठाणे, रोहित जैसवाल :

ठाणे महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाच्या गलथान कारभाराचा फटका आता ठाणेकरांना बसत असल्याचे चित्र दिसत आहे. पावसाळा तोंडावर आला असतांना आता कुठे महापालिकेने वृक्षांची छाटणी सुरु केली आहे. मात्र दुसरीकडे मागील आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे उन्मळून पडलेले वृक्ष त्यांच्या फांद्या देखील अद्याप हटविण्यात आलेल्या नाहीत. त्यात आता देखील वृक्षांची छाटणी सुरु असतांना त्याच्या फांद्या देखील रस्त्याच्या कडेला पडून आहेत. त्यामुळे वाहन चालकांना याचा त्रास तर होत आहेच, शिवाय यामुळे डासांचे प्रमाण वाढून आरोग्याच्या समस्या देखील निर्माण होण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

येत्या काही दिवसात पावसाला सुरवात होणार आहे. त्यामुळे पावसाळयापूर्वीची कामे ३१ मे पर्यंत मार्गी लावण्याचा शासकीय यंत्रणांचा प्रयत्न आहे. त्यात



वृक्ष तोडीनंतर किंवा वृक्षांच्या फांद्या छाटणीनंतर त्या तत्काळ उचलल्या जाव्यात असे आदेश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी वृक्ष प्राधिकरणाला दिले आहेत. मात्र त्याच्या उलट कारभार वृक्ष प्राधिकरणाकडून सुरु असल्याचे चित्र सध्या ठाण्यात दिसत आहे. त्यात मागील आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे ठाण्यात तब्बल ८८ वृक्ष उन्मळून पडले होते. तसेच वृक्षाच्या फांद्या देखील पडल्या होत्या.

पान २ वर

## "उच्च न्यायालयाचा निर्णय अमान्य", मुस्लिमांचा ओबीसी दर्जा रद्द झाल्यानंतर ममता बॅनर्जी आक्रमक

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

पश्चिम बंगाल सरकारने २०१० पासून ज्या जातींना ओबीसी प्रवर्गाचा दर्जा दिला होता, त्यांचा दर्जा काढून घेण्याचा निकाल कोलकाता उच्च न्यायालयाने बुधवारी (२२ मे) दिला. मात्र उच्च न्यायालयाच्या या निकालाला मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आव्हान दिले असून राज्यात ओबीसी आरक्षण जसे आहे, तसेच सुरू राहणार असल्याचे सांगितले. "पश्चिम बंगाल मागासवर्गीय (अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींव्यतिरिक्त) (सेवा आणि पदांमधील रिक्त जागांचे आरक्षण)



कायदा, २०१२" अंतर्गत दिलेले इतर मागासवर्गीयांचे (ओबीसी) आरक्षण रद्द करावे, यासाठी उच्च न्यायालयात जनहीत याचिका दाखल करण्यात आली होती. यावर सुनावणी झाल्यानंतर उच्च न्यायालयाने आपला निर्णय घेतला.

पश्चिम बंगालमधील एका निवडणुकीच्या प्रचार सभेत बोलत असताना ममता बॅनर्जी म्हणाल्या, "उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी निकाल दिलेला मला कळला. अल्पसंख्याकांनी आदिवासी जमातीचे आरक्षण हिसकावले, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. पण हे कसं शक्य आहे. यामुळे संविधानाला तडा जाऊ शकतो. अल्पसंख्याकांनी कधीही आदिवासींच्या आरक्षणाला धक्का लावलेला नाही. पण भाजपासारखे लोक यंत्रणांना हाताशी धरून अपप्रचार करण्याचा प्रयत्न करत आहेत." उच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सांगितले की, २०१० नंतर अनेकांचा बेकायदेशीररित्या ओबीसी प्रवर्गात समावेश झालेल्यांची संख्या पाच लाखांच्या वर गेली आहे.

पान २ वर

## अधिकाऱ्यांच्या रिक्त पदामुळे शिक्षण विभागाचा 'खेळखंडोबा'!

● नाशिक नितीन देवळेकर :

राज्यात विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी नव्या शैक्षणिक धोरणानानुसार विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्यात जिल्ह्यात शाळांची संख्या दरवर्षी वाढत असल्याने कामाचा ताण वाढला आहे. दुसरीकडे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात मागील काही वर्षापासून उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी यांची पदे रिक्त असल्याने शिक्षण विभागाचा खेळखंडोबा सुरू आहे.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागात चार उपशिक्षणाधिकाऱ्यांची पदे मंजूर



असताना एकच कार्यरत आहे. तीन पदे रिक्त असल्याने प्रभारी पदभार सांभाळत आहेत. गटशिक्षणाधिकाऱ्यांची १३ पदे मंजूर असताना एकच कार्यरत असून १२ पदे रिक्त आहेत. शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची ५४ पैकी ३६ पदे रिक्त असल्याने प्रभारिंच्या खाद्यावर भार वाढला आहे. अशा परिस्थितीत नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होणार कशी? असा प्रश्न उपस्थित होत आहे. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागावर जि.प. शाळांचा दर्जा उंचावण्यासोबतच तळागाळातील मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करण्याची जबाबदारी आहे. यासाठी शिक्षण विभागाने विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी अपेक्षित आहे. मात्र रिक्त पदामुळे उपक्रम राबविताना अडचणी येत आहे. रिक्त पदामुळे जिल्ह्यात पेन्शनशी संबंधित शेकडो प्रकरणे रखडली आहेत. संबंधित शिक्षकाच्या निवृत्तीपूर्वीच त्याची प्रक्रिया सुरू होते, परंतु कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे हे काम विलंबाने मार्गी लागत असल्याचे चित्र आहे.

■ जिल्ह्यात माध्यमिक व प्राथमिकसाठी उपशिक्षणाधिका-यांचे प्रत्येकी दोन असे चार पदे मंजूर आहेत. परंतु त्यापैकी प्राथमिकमध्ये एकच नियमित उपशिक्षणाधिकारी कार्यरत असून, उर्वरित तीन पदे रिक्त आहे. गटशिक्षणाधिकाऱ्यांची १३ पदे मंजूर असून, एकच कार्यरत आहे. शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची ५४ पैकी सुमारे ३६ पदे रिक्त आहेत. केंद्र प्रमुखांची १३६ पैकी २५ पदे रिक्त आाहेत. शिक्षण विभागात महत्त्वाची पदे रिक्त असल्याने कामकाज विस्कळीत झाले आहे.

## "भारतात पैशाची नाही, प्रामाणिक नेत्यांची कमतरता"- नितीन गडकरी



● नागपूर सचिन कदम :

"भारतात पैशांची कमतरता नाही. पण देशासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या नेत्यांची कमतरता आहे", असे विधान केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी चंदीगड येथे बोलताना केले. रस्ते, महामार्ग आणि पायाभूत सुविधा यांचे निर्माण करण्यासाठी नितीन गडकरी झपाटून काम करतात, हे याआधी अनेकदा दिसले आहे. पायाभूत सुविधा उभारताना प्रशासनातील लाल फितीच्या कारभारावर त्यांनी अनेकदा बोट ठेवले आहे. प्रशासनासह ते पुढाऱ्यांवरही बोलायला कमी करत नाहीत. चंदीगडमध्ये बोलत असताना त्यांनी देशाला प्रामाणिक नेते हवे असल्याचे म्हटले.

नितीन गडकरी म्हणाले, "मी १९९५ साली युतीची सत्ता असताना मी मंत्रीपद भुषविले. आज तुम्ही मुंबईत गेल्यास तुम्हाला वरळी-वांद्रे सी लिंक दिसेल. तो तयार करण्याचे भाग्य मला मिळाले. मुंबईत ५५ पूल तयार केले.

पान २ वर

## संपादकीय

# राजकीय संस्कृती जपणे निवडणूक जिंकण्याएवढेच महत्त्वाचे!

सर्वसामान्य माणसांच्या नजरेतून २०२४ च्या निवडणुका म्हणजे राजकारणातील नैतिकता, नितिमत्ता आणि विचारधारा धाब्यावर बसवण्याचा परमोच्च कळस म्हणावा लागेल. गेल्या काही वर्षांत राजकारण, राजकारणी, शासन, सरकारी यंत्रणा, शासकीय आयोग जितके बदनाम झाले, तेवढे आजवर कधीही झाले नव्हते ! उमेवार पळवा पळवी, पक्षांतर, सत्तेचा गैरवापर या गोष्टी याआधीही होत होत्या, नाही असं नाही! पण या सर्व अनुचित पद्धतींना मुख्य प्रवाहामध्ये आणून त्याला एक नैतिक अधिष्ठान देण्याचा केविलवाणा प्रयत्न गेल्या काही काळात केला गेल्याचे दिसते. आतापर्यंत जे अवैध प्रकार दबकत दबकत सुरू होते, ते आता राजरोसपणे कायद्याच्या संविधानाच्या आणि विधिमंडळाच्या चौकटीत होऊ लागले आहे. जेव्हा राजकीय नेते उघड उघड रेटून खोटं बोलतात, तेव्हा सर्वसामान्य माणसालाही कळून चुकतं की माझं ते माझं आणि तुझं तेही माझंच, या धर्तीवर महाराष्ट्रात एकामेकांना ओरबाडण्याची स्पर्धा सुरू आहे. कुठेतरी महाराष्ट्राच्या आजवरच्या ५०-६० वर्षांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक वाटचालीला गालबोट लागत आहे !

महाराष्ट्राच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासाला कुठल्याही मराठी माणसाचा विरोध असण्याचे काहीच कारण नाही. काहीही केले, तरीही लोक तर आपल्याला निवडून देणारच आहेत ही मनोवृत्ती वजा मा आता मतदारांच्या डोळ्यांत खुपू लागला आहे, हे मात्र जाणवते !

मतदारांना शंभर टक्के गृहित धरण्याची मानसिकता आणि कमरेचे सोडून डोक्याला गुंडाळण्याची वृत्ती घातक ठरत आहे. आपली अवैध कृत्ये वैधानिक चौकटीत बसविल्याच्या दुराभिमानामुळे कदाचित राजकीय पक्षांचा तात्पुरता फायदाही होईल परंतु याचे दूरगामी परिणाम महाराष्ट्राला भोगावे लागतील. कारण चोरी आणि चोरांना राजमान्यता देण्याचा प्रकार महाराष्ट्रात आजवर कधीच घडला नव्हता.

ज्या कुठल्या उमेदवाराला, राजकीय नेत्यांना किंवा पक्षांना संविधानाबद्दल मनापासून आत्मियता वाटते त्यांनी पहिल्या शंभर दिवसांमध्ये पक्षांतर बंदी कायद्यामधील सर्व पळवाटा, त्रुटी बाजूला करून राजकीय नेते आणि पक्षांवर जबरदस्त वचक ठेवणे अत्यंत निकडीचे आहे. एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्यांमध्ये अंतर्गत मतभेद यापूर्वी कधी नव्हतेच असे नाही. एकमेकांच्या भूमिका न पटण्याची बरीचशी उदाहरणे इतिहासात आहेतच, पण म्हणून किंवा स्वतःची मोठी रेघ ओढता येत नाही म्हणून इतरांच्या रेषा पुसट करण्याचे पायंडे कधी इथे इतक्या उघडपणे पडल्याचे ऐकिवात नव्हते! हे सारे ज्या सुजाण डोळस नागरिकांच्या लक्षात येते त्यांचे आता एकच म्हणणे दिसते, "म्हातारी मेली तरी चालेल काळ सोकावता कामा नये", पण कदाचित आता काळही सोकावतो आहे की काय, अशी शंका येऊ लागते.

एक-दोन दशकांपूर्वी लोकांना एकमेकांच्या जातीचा काही प्रमाणात विसर पडला होता एखाद्याने जात विचारली, तर त्याला मागास समजले जात असे. पण आज जातीवरून गट-तट एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. अगदी गावकीमध्ये आणि समाजमाध्यमांमध्येसुद्धा! महाराष्ट्रातील वातावरण जर खासगीकरण, शासकीय यंत्रणाच्या स्वायतत्ता, रोजगार या भीषण प्रश्नांपेक्षा जाती धर्माच्या विषयांवर गढूळ होत असेल तर ही धोक्याची घंटा मानावी लागेल !

मतदार आणि कार्यकर्त्यांमध्ये कोंबड्यांच्या झुंजीप्रमाणे वाद पेटवून देऊन महत्वाचे मुद्दे बाजूला सारण्यात राजकीय नेते यशस्वी होत असतील तर असे राजकारणी बाजूला सारण्याची जबाबदारी आता मतदारांची असेल. फक्त लोकसभाच नव्हे तर त्यापाठोपाठ येणाऱ्या विधानसभा, महानगरपालिका निवडणुकादेखील सुज्ञ मतदारांनी हाती घेण्याची गरज भासू लागली आहे. दोन दोन वर्षे प्रभागांमध्ये नगरसेवक, महापौर नसल्यामुळे शहरातील मुलभूत सोयीसुविधांचा जो काही बोजवारा उडाला आहे, तो केवळ डोळयांवर बांधलेल्या सत्तेच्या पट्टीमुळे दिसत नाही की काय ही शंका सर्वसामान्य माणसाला भेडसावते आहे.




## आजची चित्रोळी

कोवळ्या उन्हाला घेऊन बसली लेकां
सहवास सुखाचा हवाहवासा एकमेकां
कुरवाळून अंगा हळूच गंध टाळूंचा घेई
सौख्यांत सुखाच्या मश्गुल होऊनी जाई

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### कोल्हापूरात अनधिकृत होर्डिंगधारकांना...

शहरातील तिघा अनधिकृत होर्डिंगधारकांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मुंबई येथे भले मोठे होर्डिंग कोसळून अनेकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर राज्यात सर्वत्र तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले होते. कोल्हापूर महापालिकेने होर्डिंग धारकांची बैठक घेऊन अनधिकृत फलक काढण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानंतर कोल्हापूर महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने ही मोहीम जारी करत अनेक ठिकाणचे फलक काढण्यात आले.

बुधवारी साने गुरुजी मेन रोड येथे संतोष जाधव, भक्ती पूजा नगरातील राजेंद्र ओसवाल आणि खराडे कॉलेज जवळील नवरत्न केंद्र या तीन अनधिकृत होर्डिंग धारकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, दसरा चौकात नवग्रह रत्न केंद्र तसेच शुभेच्छा देणारे अनधिकृत फलक काढण्यात आले, अशी माहिती इस्टेट विभागाचे अधिकारी विलास साळुंखे यांनी दिली.

### डीपीएस तलावाचे चोक पॉईंट तोडण्यासाठी...

तलाव संवर्धनाचे न्यायालयाचे निर्देश

नवी मुंबई एन्व्हायर्नमेंट प्रिझर्वेशन सोसायटीमधील वीरेंद्रकुमार गांधी आणि संदीप सरीन यांनी नाईक यांना सांगितले की, ,खरे तर मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाने हा तलाव संरक्षित आहे. न्यायालयाने साडेपाच वर्षांपूर्वीच सिडकोला तलावातील पाण्याचा प्रवाह थांबणार नाही याची काळजी घेण्याचे निर्देश दिले आहेत.

### वरातीमागून घोडं; पुण्यात आता ...

बुधवारी पहाटेपर्यंत वेगवेगळया भागात कारवाई करून १२५५ वाहनचालकांची तपासणी केली. या कारवाईत ८५ वाहनचालकांनी मद्यप्राशन केल्याचे उघडकीस आले. त्यांच्याविरुद्ध खटले दाखल करण्यात आले असून, बाहतूक नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख २२ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. येरवडा, विमाननगर, चतु:शृंगी, मुंढवा, कोरेगाव पार्कसह वेगवेगळया भागात ही कारवाई करण्यात आली. मुंढवा आणि सहकारनगर भागात वाहतूक पोलिसांनी सर्वाधिक कारवाई केली आहे

### लोकशाहीत अल्पसंख्याक समुदायांना ...

त्याचवेळी १लोकशाही कशी जपावी यावर मी भाष्य करणार नाही. भारतीय नागरिक त्यांच्या लोकशाहीची काळजी घेतील,असेही ते म्हणाले.

विद्यार्थ्यांची चिंता नको

अमेरिकेतील विद्यार्थी आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर बोलताना गार्सेटी म्हणाले, १ अमेरिकेतील एकूण परदेशी विद्यार्थ्यांपैकी एक चतुर्थांश विद्यार्थी हे भारतीय आहेत. तेथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी निर्धास्त राहावे. विद्यार्थ्यांनाही त्यांचे मते व्यक्त करण्याचा अधिकार आहे. शांततापूर्ण मार्गाने आंदोलने होत असतील तोवर काहीच काळजी करण्याचे कारण नाही. अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची सर्वतोपरी काळजी घेण्यात येत आहे. सध्या व्हिसासाठी लागणारा वेळ कमी करण्यासाठीही प्रयत्न करण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये दाखल होता येईल.

### वृक्ष प्राधिकरण विभागाच्या गलथान...

परंतु आता या घटनेला आठ दिवसाहून अधिकचा काळ लोटला असतांनाही अद्यापही या वृक्षांच्या फांद्या रस्त्याच्या बाजूलाच पडून असल्याचे चित्र शहराच्या विविध भागात दिसत आहे.

ठाणे महापालिकेची यंत्रणा लोकसभा निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्याने, कामात दिरंगाई झाल्याचा दावा वृक्ष प्राधिकरण विभागाने केला आहे. मात्र आता मनुष्यबळ उपलब्ध झाले असून त्यानुसार काम सुरु करण्यात आल्याचेही सांगण्यात येत आहे. त्यातही शहरात धोकादायक स्थितीत किती वृक्ष आहेत, याची माहिती वृक्ष प्राधिकरण विभागाकडे नाही. दरवर्षी पावसाळयात महापालिका हद्दीत वृक्ष उन्मळून पडण्याच्या घटना घडत असतात. दरवर्षी हा आकडा वाढतांना दिसत आहे. परंतु त्यावर उपाय योजना करण्यात महापालिकेचा वृक्ष प्राधिकरण विभाग कुचकामी ठरत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखीत झाले आहे.

त्यात अवकाळी पावसाचा फटका ठाणेकरांना बसल्यानंतर आता कुठे वृक्ष प्राधिकरण विभागाने वृक्ष छाटणीची मोहीम हाती घेतली आहे. परंतु वृक्षांच्या फांद्या या रस्त्याच्याच कडेला पडून राहत आहेत. त्याचा त्रास वाहन चालकांना तर होतो आहेच, शिवाय या कचऱ्याला दुर्गंधी येत असून त्यातून मच्छरांची पैदासही वाढत असून यामुळे आजाराला एकप्रकारे निमंत्रणच देण्याचे काम महापालिका करीत आहे.

### उच्च न्यायालयाचा निर्णय अमान्य...

ममता बॅनर्जीकडून संविधानाचा अवमान

ज्येष्ठ विधिज्ञ आणि भाजपाचे खासदार महेश जेठमलानी यांनीही उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले. ममता बॅनर्जी २०११ साली पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी ओबीसी प्रवर्गात नव्या ४२ वर्गांचा समावेश केला. ४२ पैकी ४१ वर्ग मुस्लीम समाजाचे होते, याकडे त्यांनी वेधले. ममता बॅनर्जी यांनी मूळ ओबीसी प्रवर्गातील लोकांची फसवणूक केली असून संविधानाचाही अवमान केला आहे.

### "भारतात पैशाची नाही, प्रामाणिक नेत्यांची...

मुंबई-पुणे महामार्ग तयार करण्याची जबाबदारी मी पार पाडली. तेव्हा माझ्याकडे फक्त पाच कोटी होते. पैशांची कमतरता होती. त्यावेळी रिलायन्सचे ३६०० कोटींचे टेंडर मी रद्द केले. आज त्याची किमंत ४० हजार कोटींच्या घरात आहे. मी ते टेंडर रद्द केल्यानंतर खूप वाद झाला. सर्वात कमी किंमत त्यांनी दिली होती, अशी टीका माझ्यावर झाली. पण मला सांगायला आनंद होतो की, आम्ही कॅपिटल मार्केटमध्ये गेलो. एमएसआरडीसी सारखी संस्था निर्माण केली. आम्ही बाजारातून पैसे उभे केले. आम्ही ६५० कोटी जमवायला गेलो होतो, पण आम्हाला ११५० कोटी मिळाले. या एका प्रसंगाने मला शिकवले की, देशात पैशांची कमतरता नाही."

नितीन गडकरी पुढे म्हणाले की, आम्ही तीन-चार महिन्यापूर्वी एनएचएआय इन्फ्रास्ट्रक्चर इनव्हेस्टमेंट ट्रस्ट कंपनीला बीएसइ वर सूचीबद्ध केले. केवळ सात तासांत आमचा बॉंड प्रचंड विकला गेला. आमच्या सहकाऱ्यांकडून मला तातडीचे बोलावणे आले. मी गोव्याहून मुंबईत गेलो आणि बीएसई इमारतीमधील बेल वाजवून बॉंड बंद केला. सात पटीने अधिक त्याची विक्री झाली होती. पैशांचा पाऊस पडला. मी ५० लाख कोटींचे काम केले आहे. तरीही आणखी २० ते २५ लाख कोटींचे काम मी करू शकलो असतो, पण ते झाले नाही, याची सल माझ्या मनात आहे.

### डोंबिवलीत भीषण स्फोट! औद्योगिक सुरक्षा...

डोंबिवलीतल्या या घटनेमुळे औद्योगिक भागातील कारखाने, या कारखान्यात काम करणारे कामगार आणि या परिसरात राहाणाऱ्या लोकांची सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. याआधी 24 मे 2016 मध्ये प्रोबेस कंपनीत स्फोट झाला होता. या स्फोटात 12 जणांचा मृत्यू तर 100हून अधिक जखमी झाले होते. ऑगस्ट 2020मध्ये अंबर कंपनीत स्फोट झाला होता, याचे हादरे आजूबाजूच्या वस्तीपर्यंत जाणवले होते.

औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालय यांच्यामार्फत नियमाने कारखान्यांच्या आराखड्याला मंजुरी देता येते. नियमानुसार दोन कारखान्यांच्यामध्ये त्याचबरोबर कारखाना आणि त्याचे प्रवेशद्वार यांच्यामध्ये 3 ते 4 मीटरचं अंतर असणे बंधनकारक आहे. कारखान्याच्या आराखड्यामध्ये मोकळी जागा दाखवली असली तरीही नंतर तिथे बांधकाम केलं जातं आणि या बांधकामामुळेच एखादी दुर्घटना झाल्यास ती समस्या अधिक गंभीर होते.

निवासी भागाला सगळयात जास्त धोका

दिवसेंदिवस वाढत चाललेल्या औद्योगिक भागातील समस्यांचा येथील निवासी भागातील लोकांना सगळयात जास्त त्रास होत आहे. डोंबिवली एमआयडीसी मध्ये प्रदुषणाची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. एमआयडीसी भागातील कंपन्यांवर कुठलेही नियंत्रण नसल्यामुळे त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. शासनाच्या नियमानुसार एमआयडीसीतील औद्योगिक कंपन्या आणि निवासी विभाग यामध्ये ठराविक अंतर असण्याची गरज आहे पण प्रत्यक्षात मात्र एमआयडीसी निवासी विभाग आणि कंपन्या यामध्ये अंदाजे 200 ते 300 मीटर इतकंच अंतर आहे. त्यामुळे कुठलीही मोठी दुर्घटना झाली तरी त्याचा फटका इथल्या निवासी भागाला सहन करावा लागतो. वाढत्या प्रदुषणामुळे निवासी भागातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नसुद्धा निर्माण झाला असतानाच स्फोटासारख्या घटनेने एमआयडीसीतील रहिवासी भयभीत झाले आहेत

### ठाण्यात इव्हीएमच्या स्ट्रॉंगरुमला तिहेरी...

त्याचा निकाल ४ जून २०२४ रोजी जाहीर होणार आहे. ठाणे लोकसभेसाठी झालेल्या मतदान प्रक्रियेनंतर ईव्हीएम मशीनसाठीही घोडबंदर रोडवरील कावेसर येथील आनंदनगर येथील न्यू होरायझन शाळेत स्ट्रॉंगरूम तयार केला आहे. या ठिकाणी ठेवलेल्या इव्हीएम मशीन सुरक्षित रहाण्यासाठी तीन स्तरावर सुरक्षा ठेवण्यात आली आहे. यामध्ये सुरक्षा कर्मचाऱ्यांचा पहिला थर केंद्रीय निमलष्करी दलांचा असून यामध्ये एक अधिकारी आणि २४ अमलदारांचा यात समावेश आहे. दुसरा स्तर राज्य राखीव पोलिसांचा असून त्यामध्येही एक अधिकारी आणि २४ अमलदार तैनात ठेवले आहेत. तिसऱ्या स्तरावर स्थानिक म्हणजे ठाणे पोलिसांचा बंदोबस्त ठेवला आहे. यामध्ये दोन सहाय्यक पोलीस आयुक्तांसह दोन पोलीस निरीक्षक, आठ सहाय्यक पोलीस निरीक्षक ६६ पोलीस अमलदार यांचा फौजफाटा आहे. संपूर्ण स्ट्रॉंगरूम सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

## डोंबिवलीतील अतिधोकादायक रासायनिक कंपन्यांचे कायमस्वरूपी स्थलांतर करणार – खासदार डॉ. श्रीकांत शिंदे

कल्याण : डोंबिवली एमआयडीसीतील अतिधोकादायक रासायनिक कंपन्यांचे कायमस्वरूपी स्थलांतर करण्यात येणार असल्याचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सांगितले आहे. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याशी चर्चा झाली असून लवकरच याबाबतचा निर्णय घेतला जाणार असल्याचे ते म्हणाले.

डोंबिवली एमआयडीसीतील रासायनिक कंपनीत आज दुपारच्या सुमारास मोठा स्फोट झाला. या स्फोटाची माहिती मिळताच कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी घटनास्थळी धाव



घेत पाहणी केली. या स्फोटात सुमारे ५८ जण जखमी झाले असून या सर्वांवर खासगी आणि सरकारी रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. या जखमींची भेट घेऊन विचारपूस करत त्यांच्या कुटुंबियांना खासदार शिंदे यांनी धीर दिला. या स्फोटातील जखमींच्या उपचारांची जबाबदारी घेण्यासोबतच स्फोटामुळे नुकसान झालेल्या रहिवाशांना पंचनामा करून आठवडाभरात नुकसानभरपाई देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याचे यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले. तर डोंबिवली एमआयडीसीत वारंवार होणाऱ्या दुर्घटना आणि त्यामुळे रहिवासी भागाला निर्माण झालेला धोका लक्षात घेत डोंबिवली एमआयडीसीतील रासायनिक कंपन्यांचे ए, बी, सी असे वर्गीकरण करून अतिधोकादायक कंपन्यांचे शहराबाहेर कायमस्वरूपी स्थलांतर केले जाईल, याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याशी चर्चा झाल्याचेही खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सांगितले.

यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत, मनसेचे आमदार राजू पाटील, ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, डोंबिवली शहरप्रमुख राजेश मोरे यांच्यासह स्थानिक रहिवासी उपस्थित होते.

# सर्वकालिक श्रेष्ठ फुटबॉलपटू : सुनील छेत्री

आयपीएल अर्थात इंडीयन प्रीमियम लीग अंतिम टप्प्यात आली आहे. आयपीएलच्या या हंगामाचा विजेता कोण ठरणार याची चर्चा क्रीडा वर्तुळात सुरू असताना क्रीडा वर्तुळाला आणी क्रीडा रसिकांना धक्का देणारी बातमी आली. ती बातमी म्हणजे भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार सुनील छेत्री याने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती स्वीकारली. ही बातमी क्रीडा रसिकांसाठी धक्का देणारी होती कारण सुनील छेत्री अजूनही फीट आणि फॉर्मात होता. तो असा अचानक निवृत्ती स्वीकारेल असा अंदाज क्रीडा प्रेमींना नव्हता. सुनील छेत्री भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार होता त्याची निवृत्ती ही भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी महत्वाची बातमी व्हायला हवी होती मात्र प्रिंट मीडिया वगळता इतर कोणीही त्याच्या निवृत्तीची दखल घेतली नाही हे खेदजनक आहे. इलेक्ट्रॉनिक मीडिया ने तर त्याकडे दुर्लक्षच केले. जर भारतीय क्रिकेट संघाच्या कर्णधाराने निवृत्ती स्वीकारली असती तर किती मोठी बातमी ठरली असती मात्र क्रिकेट शिवाय इतर खेळांकडे आणि खेळाडूंकडे दुर्लक्ष करायचे ही मीडियाची विशेषतः इलेक्ट्रॉनिक मीडियाची मानसिकता भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी मारक आहे. वास्तविक भारतीय क्रिकेटमध्ये विराट कोहलीचे स्थान आहे तेच स्थान सुनील छेत्रीचे भारतीय फुटबॉलमध्ये आहे. भारतीय फुटबॉलला लोकप्रिय करण्यात आणि जागतिक पातळीवर भारतीय फुटबॉल संघाची स्वतंत्र ओळख बनवण्यात सुनील छेत्रीचा सिंहाचा वाटा आहे.

सुनील छेत्री हा भारताचा सर्वकालीक श्रेष्ठ फुटबॉलपटू आहे त्याची आकडेवारीच ते सिध्द करते. सध्या सर्वाधिक आंतरराष्ट्रीय गोल करण्याच्या बाबतीत तो जगात चौथ्या नंबरवर आहे. सध्या सक्रिय असणाऱ्या खेळाडूंमध्ये त्याच्या पुढे पोर्तुगालचा रोनाल्डो आणि अर्जेंटिनाचा मेस्सी हे दोघेच आहे म्हणूनच आंतरराष्ट्रीय फुटबॉल महासंघाने त्यांच्या निवृत्तीनंतर आपल्या अधिकृत सोशल हॅण्डल वर त्याच्या फोटोसोबत रोनाल्डो आणि मेस्सीचा ही फोटो शेअर केला. आंतरराष्ट्रीय फुटबॉल मध्ये सुनीलची कामगिरी या दोघां इतकीच दर्जेदार आहे हेच आंतरराष्ट्रीय फुटबॉल महासंघाला यातून सुचवायचे होते. भारतीय संघासाठी त्याने केलेली कामगिरी तर अविस्मरणीय आहे. भारतीय संघासाठी अप्रतिम कामगिरी करून त्याने संघाला अनेक अविश्वसनीय विजय मिळवून दिले आहेत म्हणूनच त्याला खेलरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. क्रीडा क्षेत्रातील हा सर्वोच्च पुरस्कार पटकावणारा तो एकमेव फुटबॉलपटू आहे. एका गरीब कुटुंबातील होतकरू मुलगा ते भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार असा त्याचा प्रवास प्रेरणादायी आहे. ३ ऑगस्ट १९८४ रोजी तेलंगणामधील सिकंदराबाद येथे जन्मलेल्या सुनील छेत्रीचे वडील नेपाळ सैन्य दल फुटबॉल संघात खेळायचे तर आई व बहीण या दोघीही नेपाळच्या महिला संघाचे प्रतिनिधित्व करायचे. सुनीललाही लहानपणापासून फुटबॉलची आवड होती. तो स्थानिक स्पर्धांमध्ये भाग घेऊ लागला.



स्थानिक स्पर्धांमध्ये चमक दाखवल्याने त्याला मोहन बागान संघाकडून खेळायची संधी मिळाली. २००२ ते २००५ या काळात त्याने या संघाकडून खेळताना तब्बल १८ गोलांचा पाऊस पाडला याच कामगिरीच्या बळावर त्याने भारताच्या २० वर्षाखालील संघात स्थान मिळवले आणि पहिल्याच लढतीत गोल करून पाकिस्तान विरुद्ध १ - ० असा विजय साजरा केला. २००७ साली त्याला भारताच्या वरिष्ठ संघाकडून खेळण्याची संधी मिळाली. वरिष्ठ संघाकडून खेळण्याची संधी मिळताच त्याने भारताला नेहरू चषक जिंकून दिला. फिफा विश्वचषक पात्रता स्पर्धा, साफ स्पर्धा, एएफसी चॅलेंज चषक, आशिया चषक अशा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत त्याने चमकदार कामगिरी केली याच कामगिरीच्या बळावर त्याची भारतीय फुटबॉल संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली. भारतीय संघाचे कर्णधारपदही त्याने लीलिया सांभाळले.

त्याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने जगातील सर्वोत्तम संघांना नमवण्याची किमया केली. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये ५० गोल करणारा तो भारताचा पहिला फुटबॉलपटू ठरला. आज त्याच्या नावापुढे ९४ आंतरराष्ट्रीय गोल आहेत. पुढील महिन्यात कुवेत विरुद्ध होणारा सामना हा त्याच्या कारकिर्दीतील शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना असेल. हा सामना जिंकून तो त्याच्या कारकिर्दीचा शेवट गोड करेल यात शंका नाही. भारताचा सर्वकालिक श्रेष्ठ फुटबॉलपटू असलेल्या सुनील छेत्रीला मनापासून शुभेच्छा!

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## थोडक्यात



### फ्लेमिंगो पक्ष्यांचा मार्गबदल का?

● येथील नेरुळ परिसरातील एनआरआय तलाव आणि डीपीएस तलाव या दोन्ही पाणथळ जागा ही फ्लेमिंगोंच्या अधिवासाची ठिकाणे नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात असतानाच मुंबई विमानतळावर उतरणाऱ्या विमानाच्या धडकेने ३९ फ्लेमिंगोंचा मृत्यू झाला आहे. यामागे फ्लेमिंगोंचा नवी मुंबईतील अधिवास नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू असून फ्लेमिंगोंना विमानांच्या मार्गाबाबतची नैसर्गिक जाण असताना अचानक विमानांच्या मार्गात हे पक्षी का गेले याबाबत सखोल चौकशी करण्याची आवश्यकता पर्यावरणप्रेमींना व्यक्त केली आहे.

टी. एस चाणक्य व एनआरआय तलावात दररोज लाखो फ्लेमिंगोंचे आगमन होत असताना दुसरीकडे नेरुळ येथील डीपीएस चाणक्य तलवात येणारा पाण्याचा स्रोत बंद केला असल्याने फ्लेमिंगोंच्या मृत्यूच्या घटना घडली होती. तर मुंबईत सोमवारी सकाळच्यावेळी विमानाच्या धडकेत ३९ फ्लेमिंगोंचा मृत्यू झाल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये संताप निर्माण झाला असून फ्लेमिंगोंचा अधिवासच नाहीसा करण्याच्या प्रकारामुळे फ्लेमिंगोंच्या मृत्यूच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

■ सिडको फ्लेमिंगोंच्या जिवावर उठले असून पाणथळ जागा नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. सरकारला अनेक वर्षे ओरडून सांगतोय पाणथळ जागा वाचवा पण त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. दुर्घटनेत ३९ फ्लेमिंगोंचा मृत्यू झाला त्याचे काही नाही. याच दुर्घटनेत एखाद्या विमान प्रवाशाचा मृत्यू झाला असता तर ती ग्लोबल हेडलाईन झाली असती.

**-बी. एन. कुमार, संचालक, नॅटकनेक्ट**

■ पक्ष्यांना आवाजाबाबत नैसर्गिक देणगी असते. ठाणे खाडीमध्ये भरती असल्यामुळे हे पक्षी नवी मुंबईत येतात. परंतू येथून त्यांना पहाटेच्या वेळी स्फोटक आवाज करून हाकलवण्याचा प्रयत्न झाला का? ते भरकटून विमान मार्गाच्या दिशेने गेले का अशी शंका आहे. यामागे मानवी हस्तक्षेप होता का हे तपासण्याची गरज आहे.

**-सुनील अग्रवाल, सेव्ह एन्व्हायर्न्मेंट**

■ ३९ फ्लेमिंगो पक्ष्यांचा मृत्यू ही अत्यंत दुर्दैवी घटना असून नवी मुंबई परिसरात पाणथळ जागा नष्ट करण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे. भरती-ओहोटीनुसार या पक्ष्यांचे ठिकाण बदलत असून याबाबत सखोल चौकशी झालीच पाहिजे.


**-किशोर रिठे, संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी**

# बारवी धरणात उरला फक्त 31 टक्के पाणीसाठा, बाष्पी भवनामुळे धरणांच्या पातळीत घट

● ठाणे : ठाणे जिल्ह्याला उष्णतेच्या झळा बसत असून धरणातील पाणी साठ्यात देखील बाष्पीभवनामुळे घट होताना दिसत आहे मागील वर्षाच्या तुलनेत बारवी धरणातील पाणीसाठा हा तीन टक्क्यांनी खाली आला आहे.

तसेच ठाणे जिल्ह्याला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांची पाणी पातळी ती 30 ते 35 टक्क्यांच्या आसपास आहे. पाण्याची खालावलेली पातळी पाहता पाणी शटडाऊन म्हणजेच अप्रत्यक्षपणे पाणी कपातीत वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ठाणे जिल्ह्यात एप्रिल महिन्यापासून उष्णतेचा पारा चढला असून असह्य उष्म्यामुळे जनता हैराण झाली आहे. एप्रिल ते मे महिन्यात उष्णता वाढली की त्याचा परिणाम धरणांतील पाणी साठ्यावर सर्वाधिक होतो. या पाण्याचे बाष्पीभवन होऊन धरणातील पाण्याच्या पातळीत झपाट्याने घट होत जाते. त्याचा परिणाम



15 जूलै पर्यत पुरेल असे पाण्याचे नियोजन करण्यात येते. पाणी कपातीचा कोणताही निर्णय नाही असे शासनाकडून सांगितले जाते. पाणी कपात केली जात नसली तरी देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली पाणी पुरवठा बंद ठेवणे आणि त्यानंतर पुरवठ्यावर होणारा परिणाम यामुळे अनेक भागांत पाणी टंचाईचा सामना नागरिक करत आहेत.

जिल्ह्यात मागील महिन्यापासून उष्णतेमध्ये वाढ झाली आहे. मुंबई, ठाणे आणि उपनगरांना पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांमधील पाण्याचे अधिक प्रमाणात बाष्पीभवन होऊन, धरणाच्या पातळींमध्ये घट होत आहे. ठाणे, मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांमधील पाण्याची पातळी ही 30 ते 35 टक्क्यांवर आली आहे.

ठाणे जिल्ह्याला पाणीपुरवठा करणारा मुख्य स्रोत असलेले बारावी धरणात सध्याच्या घडीला 31 टक्के पाणीसाठा आहे. धरणातील पाण्याची पातळी ही 60.52 मीटर असून 106 द.ल.घ.मी. पाणीसाठा आहे. मागील वर्षी याच दिवशी धरणात 34 टक्के पाणीसाठा होता. पाण्याची पातळी ही 61.24 मी इतकी तर 115.60 द.ल.घ.मी. इतका पाणीसाठा होता.

■ शहापूर तालुक्यातील भातसा धरणा सध्याच्या घडीला 29.52 टक्के पाणीसाठा आहे. पाण्याची पातळी ही 109 मीटर असून 278.1 69 द.ल.घ.मी. एवढा पाणीसाठा आहे.

■ तसेच तानसा धरणात 29. 47 टक्के, मोडक सागर मध्ये 18.58 टक्के, मध्य वैतरणा मध्ये 11.10 टक्के पाणीसाठा आहे. हा साठा पाऊस पडेपर्यंत पुरेसा असल्याचा दावा जलसंपदा, लघु पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे.

■ जून अखेरपर्यंत मुंबई, ठाणे शहरांना दैनंदिन पुरेसा पाणी पुरवठा होईल एवढा पाणीसाठा ठाणे जिल्ह्यातील धरणांमध्ये आहे. त्यामुळे पाणी कपातीची कोणतीही शक्यता नाही असे लघु पाटबंधारे विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## स्फोटात जखमी झालेल्यांसाठी एम्स हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनी केले रक्तदान



● कल्याण : डोंबिवली एमआयडीसीमध्ये झालेल्या स्फोटात जखमी असलेल्या रुग्णांच्या उपचारासाठी एम्स हँस्पीटल कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपत्कालीन परिस्थितीत आपले कामकाज संभाळत ८१ युनिट रक्तदान केले.

एम्स हँस्पीटल कर्मचारी यंत्रणेने बाँयलर स्फोटत जखमी झालेल्या 26 रूग्णांना उपाचारार्थ दाखल करून जखमीवर उपचार सुरु केले. या जखमीना तसेच इतर रुग्णालयात दाखल असलेल्या जखमी रुग्णांच्या उपचारसाठी एम्स हॉस्पिटल कर्मचाऱ्यांनी आपले कामकाज संभाळत रक्तदान केले. प्लाझ्मा ब्लड बँकेच्या माध्यमातून तब्बल ८१ युनिट रक्ताच्या बाटल्या संकलित केल्या यामध्ये एम्स हँस्पीटल कर्मचारी वर्गाचे ८० टक्के योगदान होते. तर कर्मचारी रक्त दान करीत असलेले पाहून उपस्थितांपैकी काहीजण पुढे येत त्यांनी देखील रक्तदान करीत एक सामाजिक बांधिलकीचा अगळा आर्दश यानिमित्ताने उभा केला आहे.

## निवृत्तवेतनधारकांना जिल्हा कोषागार कार्यालयाचे आवाहन



● ठाणे – काही निवृत्ती वेतनधारकांकडून ऑनलाईन रक्कम भरल्यानंतर कोषागारातील थकीत रक्कम मिळणार असल्याचे सांगून रक्कम ऑनलाईन, गुगल पे, फोन पे किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांव्दारे मागितल्याच्या तक्रारी जिल्हा कोषागार कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत. जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत निवृत्ती वेतनधारकांना कोणत्याही प्रकारचा फोन केला जात नाही तसेच कोषागाराच्या कर्मचाऱ्यांना घरीही पाठविले जात नाही.

■ कोणत्याही प्रकारच्या दूरध्वनीद्वारे असे व्यवहार करण्यापूर्वी कोषागार कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी व अपर कोषागार अधिकारी (निवृत्ती वेतन) सुरेंद्र राऊत यांच्याकडून करण्यात आले आहे. तसेच निवृत्तीधारकांनी परस्पर रक्कम भरल्यास ती त्यांची वैयक्तिक जबाबदारी राहील, असेही कोषागार कार्यालयाने कळविले आहे.

## महावितरण कंपनीत लावण्यात येणाऱ्या स्मार्ट प्रिपेड पॉवर मिटर योजनेला वर्कर्स फेडरेशनचा तीव्र विरोध

● कल्याण : महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने राज्यभरांत २ कोटी २५ लाख ६५ हजार स्मार्ट प्रिपेड मिटर्स लावण्याच्या घेतलेल्या निर्णयाला महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचा तिव्र विरोध आहे. योजना आणण्यापुर्वी कर्मचाऱ्यांच्या संघटना बरोबर कोणतीही चर्चा महावितरण कंपनीच्या व्यवस्थापनाने न करता स्मार्ट मीटर लावण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर,चंद्रपूर ,गोंदिया,अकोला,अमरावती या चार झोनमधे ५२०६९८२ मिटर्स लावण्याचे टेंडर अनुक्रमे मे.मॅटिकर्ता व मे.जिनस कंपनीला देण्यात आले आहे.कॉन्टक्ट मिळाला असल्याने या खाजगी कंपन्या मिटर्स लावण्याच्या कामाचा उदा.मोहल्ला, विभाग,एरिया,ग्राहकाचे मिटरचे स्थान,फिडर



इ. माहितीसाठी सर्व्हे सुरू करण्याच्या बेतात आहेत त्यांत महावितरण मधील कर्मचाऱ्यांनी या खाजगी कंत्राटदारांना कोणतेही सहकार्य करू नये ते काम करण्याची महावितरणच्या कर्मचाऱ्यांची जबाबदारी नाही असे आवाहन वर्कर्स फेडरेशनने केले आहे.

स्मार्ट प्रीपेड मिटर्स हा वीज उद्योगात खाजगीकरणाची वाटचाल करणारा निर्णय असल्याचे वर्कर्स फेडरेशनचे ठाम मत आहे. महावितरण कंपनीच्या स्वतःच्या मालकीचे सध्या असलेले अडीच कोटी मिटर्स स्मार्ट मिटर्स बसविल्यामुळे भंगार होणार असून त्याचा आर्थिक फटका महावितरणला होऊन तो आर्थिक बोजा वीज दरवाढीत ग्राहकांबर बसवला जाणार आहे.

स्मार्ट मीटर योजना व सुधारित वितरण क्षेत्र योजने अंतर्गत ४० टक्के रक्कम महाराष्ट्रात महावितरण कंपनीला कर्जरूपाने उभारावी लागणार असून त्यावरील व्याजाचा बोजाही महावितरण ला सोसावा लागणार आहे.

## ग्रामीण भागांतील खेळाडूंना राज्य, राष्ट्रीय स्तरांवर मिळणार खेळण्याची संधी

### बीड जिल्ह्यात तीन ठिकाणी रॉकेट बॉल खेळाच्या साहित्याचे वाटप



● कल्याण : ग्रामीण भागांतील खेळाडूंना राज्य, राष्ट्रीय स्तरांवर खेळण्याची संधी मिळणार असून बीड जिल्ह्यात तीन ठिकाणी टीम परिवर्तनच्या वतीने रॉकेट बॉल खेळाच्या साहित्याचे वाटप करण्यात आले. यामुळे बालग्राम, सेवाश्रम आणि इन्फंट इंडिया आनंदग्राम या संस्थेतील मुलांना रॉकेट बॉल खेळाचा आनंद घेता येणार आहे.

ग्रामीण भागांतील खेळाडूंना राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळण्यासाठी आवश्यक सुविधा देण्यासाठी टीम परिवर्तन संस्था सातत्याने प्रयत्न करत असते. टीम परिवर्तन संस्थेच्या प्रयत्नांतून यापूर्वी खातेलीवाडी ता. रोहा, जि. रायगड तसेच कोनावाडी, टिटवाळा जि. ठाणे येथे देखील खेळाच्या मैदानाचे उदघाटन होऊन सरावास सुरुवात करण्यात आली आहे. टीम परिवर्तनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील खेळाडु जयपूर येथे आयोजित पंच प्रशिक्षण शिबीर आणि राष्ट्रीय स्पर्धेत अनेक वेळा सहभागी झाले आहेत. अत्यंत दुर्गम भागांतील युवकांना खेळाचे प्रशिक्षण देण्यासाठी टीम परिवर्तनने पुढाकार घेतला आहे. बीड जिल्ह्यातील बालग्राम, सेवाश्रम आणि इन्फंट इंडिया आनंदग्राम या संस्थेत समाजातील वंचित घटकातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने या संस्थांचा दिनक्रम चालत असतो याचं मुलांना आता या खेळाचा आनंद घेता येणार आहे.

■ **बालग्राम, सेवाश्रम आणि इन्फंट इंडिया आनंदग्राम या संस्थेतील मुलांना घेता येणार रॉकेट बॉल खेळाचा आनंद**

### उद्यानात कार्यकर्त्यांचा 'श्रमपरिहार'!

## नवी मुंबई पोलीस तसेच महापालिका अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

● नवी मुंबई : मागील काही दिवसांपासून देशात व राज्यात लोकसभा निवडणुकांचा धडाका सुरू आहे. मुंबई व परिसरात सोमवारी (ता.२०) मतदान पार पडले. सोमवारी मतदानाची प्रक्रिया पार पडल्यानंतर ऐरोली विभागात विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांनी चक्क पालिकेच्या ऐरोली सेक्टर १५ येथील स्वामी विवेकानंद उद्यानात श्रमपरिहार




केल्याचे पाहायला मिळाले.

पालिकेची उद्याने शहरातील आबालवृद्धांसाठी विरंगुळ्याची ठिकाणे आहेत की तरुणांसाठी व विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांसाठी श्रमपरिहार करण्याची ठिकाणे आहेत असा प्रश्न निर्माण झाला आहे. मतदानानंतर सार्वजनिक जागा असलेल्या उद्यानांमध्ये याच विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांचा श्रमपरिहार पाहायला मिळाला. उद्यानातच होत असलेल्या पार्ट्यांबाबत आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. उद्यानातील खुलेआम प्रकाराबाबत पालिका व पोलीस दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरीक करत आहेत.

## बैलगाडा शर्यतीमध्ये बैलाच्या ठोकरीत एक जखमी



● पनवेल : पनवेलमधील बैलगाडा शर्यतीमध्ये गोळीबार केल्यामुळे पोलीसांनी कारवाई केल्यामुळे राहुल पाटील व त्याच्या सहकाऱ्यांना कारागृहात रहावे लागल्याची घटना ताजी असताना आठवड्याच्या रविवारी नेरे येथे बैलगाडा शर्यतींचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी चार वाजता या शर्यतींच्या सामन्यादरम्यान ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ ढोकेगाव येथील जयेश जाधव हा गंभीर जखमी झाल्याची तक्रार पोलिसांकडे आल्यावर पोलिसांनी शर्यतीचे आयोजन करणाऱ्यांवर गुन्हा नोंदविला आहे.


पनवेल तालुक्यामध्ये दर आठवड्याला बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले जाते. शेतकऱ्यांचा एक मोठा वर्ग त्यांच्या हातची सर्व कामे बाजूला सारुन शर्यतींचे सामने पाहण्यासाठी एकत्र येतात. यापूर्वी पनवेलच्या ग्रामीण भागात बैलगाडा शर्यतीचे आयोजन केल्याने दोन गटात राडा झाला. आणि किरकोळ भांडणातून सुरु झालेल्या या राड्यात एका गटाने थेट गोळीबार केला. पोलिसांना याबाबत काहीच माहिती नव्हती त्यानंतर गोळीबाराची व्हीडीओ समाजमाध्यमांवर फिरू लागल्यानंतर नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पोलीसांनी पनवेलमध्ये विना परवानगी बैलगाडा शर्यतीवर निर्बंध आणले होते. पनवेल तालुका पोलीसांनी याबाबत रितसर गुन्हा नोंदविला आहे.

# शहापूरमध्ये केवळ जलवाहिन्या पाणी मात्र नाही

### वाढीव टँकरचे प्रस्ताव कागदोपत्रीच; शहापूरवासियांचा जल आक्रोश सुरूच

● ठाणे: शहापूर तालुक्यातील ज्या गाव – पाड्यांमध्ये तीव्र पाणी टंचाई आहे त्या ठिकाणी नियोजन करून वाढीव टँकर पुरविण्याचे नियोजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने एप्रिल महिन्यात करण्यात आले होते. मात्र हे नियोजन केवळ कागदोपत्रीच राहिले असून मे महिन्याचा अखेर उजाडला असूनही शहापूर तालुक्यातील गावांना अधिकचा पाणी पुरवठा उपलब्ध होऊ शकलेला नाही. तर दुसरीकडे जलजीवन मिशनच्या माध्यमातून संपूर्ण शहापूर तालुक्यात गेल्या वर्षभरापासून केवळ जलवाहिन्या टाकून प्रत्येक घरात नळ जोडणी देण्यात आली आहे. मात्र याद्वारे पाणी पुरवठाच सुरू केला नसल्याने ग्रामस्थांकडून तीव्र असंतोष व्यक्त केला जात आहे.

जिल्ह्यातील मुरबाड आणि शहापूर तालुक्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईची समस्या जाणवत असते. जिल्हा परिषद तसेच जिल्हा प्रशासनाच्या वतीने दरवर्षी या ठिकाणी पाणीपुरवठा करण्यासाठी विविध उपाययोजना आखण्यात येतात. विंधन विहिरींची उभारणी, 'जल मिशन' द्वारे पाण्याचा पुरवठा, 'हर घर जल मिशन' यांसारख्या विविध योजनांची अंमलबाजवणी या दोन्ही तालुक्यांतील गावांत करण्यात येत आहे. मात्र या योजना केवळ कागदोपत्रीच असल्याने दरवर्षी प्रमाणे यंदाही शहापूर वासियांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. यावर्षी फेब्रुवारी महिन्याच्या अखेर पासूनच शहापूर तसेच मुरबाड तालुक्यात पाणीटंचाई जाणवू लागली होती. पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून शहापूर तालुक्यातील काही गाव पाड्यांमध्ये टँकरने आणि पुरवठा सुरू केला होता. मात्र गेल्या महिन्यात ज्याप्रमाणे उन्हाचा तडाखा वाढू लागला त्याचप्रमाणे शहापूर मध्ये पाणीटंचाईची समस्या देखील अधिक तीव्र होऊ लागली. पाणीटंचाईची समस्या कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने एप्रिल महिन्यात शहापूर तालुक्यात वाढीव टँकर देण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र अद्यापही शहापूर तालुक्यात परिस्थिती तशीच कायम असल्याने ग्रामस्थांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. याच पाणीटंचाईला त्रस्त होऊन ग्रामस्थांनी स्थानिक प्रशासकीय कार्यालयांवर हंडा मोर्चा देखील काढला होता. मात्र त्याचाही प्रशासनावर काही फायदा झाला नसल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात आले आहे.



### जल जीवन मिशनचे नेमके झाले काय ?

मागील एक ते दीड वर्षाच्या कालावधीत शहापूर तसेच मुरबाड तालुक्यात कोट्यवधी रुपयांच्या निधीतून जलजीवन मिशन राबविण्यात आले. या अंतर्गत शहापूर तालुक्यात जलवाहिनी टाकण्याचे काम करण्यात आले. तसेच प्रत्येक घरात यातून नळ जोडणी देखील देण्यात आली आहे. मात्र अद्याप या नळांद्वारे नागरिकांना पाणीपुरवठा होऊ शकलेला नाही. त्यामुळे यांना जोडण्याचे काय करायचे असा सवाल आता संत शहापूरवासीय करत आहेत. तर ३० मार्च रोजी शहापूरला या जलवाहिन्यांद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजन जिल्हा प्रशासन आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करण्यात आले होते. मात्र हा मुहूर्त नेमका हुकला कुठे याबाबत जिल्हा प्रशासन निरुत्तर आहे.

### विहिरी नको टाक्या हव्या

जिल्हा प्रशासनाकडून पाणीटंचाईची समस्या कमी करण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा केला जात असला तरीही तो अपुराच असल्याचे दिसून येत आहे. त्यातही टँकर मधून येणारे पाणी हे विविध गाव पाड्यांमध्ये विहिरींमध्ये टाकण्यात येते. सध्याची तीव्र उन्हाळ्याची परिस्थिती पाहता हे सर्व पाणी कोरड्या ठाक पडलेल्या विहिरींमध्ये झिरपून जाते. यामुळे हे टँकरचे पाणी देखील नागरिकांना मुबलक प्रमाणात उपलब्ध होऊ शकत नाही. यामुळे टँकर मधून येणारे पाणी विहिरींमध्ये नको तर टाक्यांमध्ये खाली करण्यात यावे द्यावे अशी मागणी आता ग्रामस्थ करत आहे. तर येथील पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून दिरंगाई केली जात असल्याची प्रतिक्रिया येथील पाणी टंचाईवर काम करण्याच्या श्रमजीवी संघटनेच्या वतीने देण्यात आली आहे.

# अतिशा नाईक पुन्हा साकारणार खलनायिका

## ‘येड लागलं प्रेमाचं’ मालिकेबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता



27 मे पासून येड लागलं प्रेमाचं ही नवीन मालिका स्टार प्रवाहवर सुरु होत आहे . या मालिकेत पंढरपुरच्या मातीत रंगलेली रांगडी प्रेम कहाणी अभुनवण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. उत्कंठावर्धक कथानकासोबतच दिग्गज कलाकारांची फौज ही या मालिकेची आणखी एक जमेची बाजू आहे. सुप्रसिद्ध अभिनेत्री अतिशा नाईक (Atisha Naik) या मालिकेतून खलनायिकेच्या रुपात भेटीला येतील. शशीकला असं त्यांच्या व्यक्तिरेखेचं नाव असून कोणाचही भलं झालेलं तिला आवडत नाही. प्रत्येकाबद्दलच तिच्या मनात एक असूया आहे.

शशीकलाचं अधुरं स्वप्न

अभिनेत्री होण्याचं शशीकलाचं स्वप्न होतं. मात्र हे स्वप्न अधुरच राहिलं. त्यामुळे नटण्याची तिला प्रचंड आवड आहे. स्वार्थी, अप्पलपोटी आणि पैशांचा माज दाखवणारी अशी ही शशीकला साकारताना अभिनेत्री म्हणून कस लागत आहे, अशी भावना अतिशा नाईक यांनी व्यक्त केली.

अतिशा नाईक भूमिकेविषयी म्हणाल्या...

शशीकला या भूमिकेबद्दल सांगताना अतिशा नाईक म्हणाल्या, “मी आजवर अनेक खलनायिका साकारल्या. मात्र शशीकलाची बातच न्यारी आहे. तिची घरात प्रचंड दहशत आहे. तिच्या पेहरावातून, चालण्यातून, बोलण्यातून याची कल्पना येते. मला खात्री आहे शशीकलाचा अंदाज प्रेक्षकांना नक्कीच भावेल. शशीकलाच्या दागिन्यांची, तिच्या साड्यांची नक्कीच चर्चा रंगेल. शशीकलाचा मालिकेतली मुख्य नायिका म्हणजेच मंजिरीवर विशेष राग आहे. मंजिरी या घरात नसती तर एव्हाना शशीकलाने संपूर्ण घर आपल्या नावावर करुन घेतलं असतं. मंजिरीच्या सुरळीत होणाऱ्या गोष्टींमधे अडचणी आणून त्या कुटुंबाची कोंडी करायची हे काम शशीकला नेटानं करत असते. शशीकलाचे डाव यशस्वी होतात का हे पहायचं असेल तर नक्की पहा आमची नवी मालिका येड लागलं प्रेमाचं.”

# सध्या वळवाचा पाऊस पडत असल्याने घ्या आरोग्याची काळजी



उन्हाळ्याच्या अखेरीस मे महिन्यात वादळी वाऱ्यासह मॉन्सनपूर्व पाऊस होत आहे. त्यातच मॉन्सूनने अंदमानात हजेरी लावली. जूनच्या पहिल्या आठवड्यात मॉन्सून राज्यात येऊ शकतो. या पाश्वर्श्वभूमीवर पावसाळ्यात आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे असते.

पावसाळ्यात पाण्याशी संबंधित व्याधी उद्भवतात. पोटाच्या तक्रारीही डोके वर काढण्याची शक्यता असते. टायफॉइड, डायरिया, काविळीची साथ पसरत असते. रस्त्यावर जागोजागी तुंबलेल्या पाण्यात डासांची पैदास होते. परिणामी, यामुळे मलेरिया डेंगीचा प्रादुर्भाव होतो.

पावळ्यात इन्फेक्शन, कफ, सर्दी होण्याची शक्यता असते. या काळात हलके जेवणासह तिखट, कांदा भजी, बटाटावडा असे तेलकट पदार्थ खाण्याचा टाळल्यास शरीरात कोणत्याही प्रकारचे इन्फेक्शन होत नाही. परंतु, आजाराची लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेतल्यास आजार दूर करता येतो.

उद्भवणारे आजार

पावसाच्या दिवसांत पचन न होणारा आहार घेतल्यास शारीरिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता असते. त्यासाठी थंड पदार्थ, तेलकट पदार्थ, फास्ट फूड, उपवासासाठी शेंगदाणे, भगर हे पदार्थ खाणे टाळावे. पचायला हलके आणि उष्ण पदार्थ शक्यतो घ्यावे. यामध्ये बेसन लाडू, टोमॅटो सूप, वांगी, भेंडवळ, कैरी, लिंबू, चिंच, सुखे खोबरे या पदार्थांचा वापर करावा.

शिवाय तांदूळ, गहू, यापासून विविध पदार्थ बनवून याचे सेवन केल्यास आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. डास चावल्यामुळे हिवताप, मलेरिया होतो, एनॉफिलीस जातीच्या मच्छराने दंश केल्यास हिवतापाची लागण लगेच होते. सर्दी, खोकला अंगावर ओले कपडे जास्त वेळ, पावसात भिजणे यामुळे सर्दी खोकल्यासारखे किरकोळ आजार उद्भवतात. ढगाळ वातावरणामुळे पावसाळ्यात दमा असणाऱ्या रुग्णांना त्रास जास्त जाणवतो. दमट, गार हवा आणि मंद पचनशक्ती यामुळे दम्याचा त्रास वाढतो. तसेच पावसाळ्यात पाण्याचे प्रदूषण जास्त होते.

अन्नपचन मंदावते

पावसाळ्यातील थंड वातावरण व पावसात साचलेल्या पाण्यातून अनेक प्रकारचे आजार निर्माण होतात. त्यातच वातावरणामुळे जाठराग्नी मंद झालेला असतो म्हणजेच अन्नपचन मंदावलेले असते. पोट बिघडून उलट्या होणे, जुलाब लागणे व भूक न लागणे अशा पोटाच्या तक्रारी चालू होतात.

त्यामुळे घरी शिजवलेले, ताजे, हलके व स्वच्छ अन् खावे, बाहेरचे, उघड्यावरील चमचमीत पदार्थ टाळावेत. संध्याकाळी दरवाजे व खिडक्या लवकर बंद करून घेणे व डास आपल्याला चावणार नाहीत याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. वर्षा ऋतू मध्ये वात प्रकोप होत असतो. त्यामुळे सांधेदुखी चे आजार वाढण्याची शक्यता असते.

अशी घ्यावी काळजी

रस्त्यावरील उघड्यावरचे पदार्थ खाऊ नयेत.

पावसाळ्यात पाणी उकळून घ्यावे.

पालेभाज्या, फळे वापरताना मिठाच्या पाण्यात स्वच्छ धुवाव्यात.

पावसाळ्यामध्ये आयुर्वेदिक अरविंदासच, महासुदर्शन काढा वैद्यांच्या सल्ल्याने ही औषधे यावीत.

पावसात भिजल्यास तत्काळ कपडे बदलावेत.

# कोहलीला संघात न घेण्यासाठी भारतात कारणे का शोधतात? विराटसाठी दिग्गज खेळाडूची ‘बॅटिंग’

विराट कोहलीला संघात न घेण्यासाठी भारतात कारणे का शोधतात? ट्वेन्टी-२० विश्वकरंडक स्पर्धेसाठी माझी पहिली पसंती विराट कोहली हीच असती, अशा शब्दात ऑस्ट्रेलियाचा माजी दिग्गज कर्णधार रिकी पॉंटिंगने विराटसाठी बॅटिंग केली आहे.

या आयपीएलमध्ये विराट कोहली कमालीचे सातत्य दाखवत आहे. १४ सामन्यांत मिळून त्याने एका शतकासह सर्वाधिक ७०८ धावा केल्या आहेत; परंतु स्ट्राईक रेटवरून त्याच्यावर टीका केली जात आहे.

विराट कोहलीचा दर्जा आणि अनुभव याची तुलना कोणाबरोबरही होऊ शकत नाही किंवा दुसरा कोणताही तेवढा सक्षम पर्यायही नाही, त्यामुळे माझ्यासाठी विराट हा पहिल्या पसंतीचा खेळाडू आहे, असे सांगून पॉंटिंग म्हणतो, हा प्रकार केवळ हास्यास्पद आहे, कारण भारतातील लोक नेहमीच कारणांचा शोध घेत असतात किंवा तो इतर काही खेळाडूंपेक्षा सरस ठरणार नाही, असे सांगतात.



येत्या विश्वकरंडक स्पर्धेत विराटने रोहित शर्मासह सलामीला खेळावे. सूर्यकुमारसारखे खेळाडू मधल्या फळीत सरासरी उंचावण्यासाठी सक्षम आहेत, असेही पॉंटिंगने सुचवले आहे. निवड समितीला हा निर्णय घ्यावा लागेल, कारण यशस्वी जयस्वाल हा तेवढासा फॉर्मात नाही. डावखुरा फलंदाज म्हणून त्याला संघात ठेवायचे असेल तर मधल्या फळीत खेळवावे, असे पॉंटिंगने सुचवले आहे.

कोहलीने यंदाच्या आयपीएलमध्ये एक शतक केले आहे. आयपीएलमध्ये त्याचे हे एकूण आठवे शतक आहे. त्याच्या अशा सातत्यपूर्ण कामगिरीमुळे बंगळूर संघाला यंदाच्या स्पर्धेत प्ले ऑफ गाठता आलेला आहे.

विराटच्या स्ट्राईक रेटबाबत बोलले जात असले तरी यंदाच्या स्पर्धेत त्याचा स्ट्राईक रेट १५५.६० इतका आहे. गेल्या १७ वर्षातील हा त्याचा सर्वोत्तम स्ट्राईक रेट आहे. सध्याच्या युगात सरासरीपेक्षा स्ट्राईक रेटला अधिक महत्त्व दिले जाते; परंतु विराटच्या भारतीय संघातील उपयुक्ततेला दुसरा पर्याय नाही, असे पॉंटिंगने सांगितले.

तीन-चार वर्षांपूर्वी वरच्या क्रमांकावर खेळणारा फलंदाज ६० चेंडूत ८० किंवा १०० धावा करत होता त्यासुद्धा पुरेशा होत्या. त्यावेळी कोणी स्ट्राईक रेटबाबत बोलत नव्हते; परंतु आता सर्वाधिक चर्चा स्ट्राईक रेटची असते. ५५ चेंडूत ८० धावांऐवजी १५ चेंडूत ४० धावा यांना अधिक महत्त्व दिले जाते, अशी तुलना पॉंटिंगने केली.

२०२२ मधील ट्वेन्टी-२० विश्वकरंडक स्पर्धेत विराटने पाकिस्तानविरुद्ध ८२ धावांची जबरदस्त खेळी केली होती. त्यानंतर उपांत्य फेरीत इंग्लंडविरुद्धही अर्धशतक केले होते. कठीण परिस्थितीत भरवसा सिद्ध करणारा फलंदाजच महान असतो, असे पॉंटिंगने म्हटले.

## दिनविशेष

**घटना**

२०००: कोची झलेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत तिरुअनंतपुरमचा नऊ वर्षाचा बुद्धिबळपटू अर्जुन विष्णुवर्धन याला भारतातील सर्वात लहान फिडे मास्टर होण्याचा मान मिळाला.

१९९८: मर्सिडीज-बेंज कंपनी ने क्रिस्लर हि कंपनी ४० अब्ज अमेरिकन डॉलर्स मध्ये विकत घेतली ही इतिहासातील सर्वात मोठी औद्योगिक

विलीनीकरण आहे.

१९९२ : एन्डेव्हर हे अंतराळयान आपल्या पहिल्या मोहिमेवर निघाले..

१९९०: लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान.

१९७६: होंडा एकॉर्डा या गाडी प्रकाशित करण्यात आली.

१९५५: एअर इंडिया ची मुंबई - टोकियो विमानसेवा सुरू झाली.

१९४६: सोनी कंपनी ची स्थापना झाली.

१९०७ : मुंबईत विजेवर चालणारी ट्रॅम सुरू झाली.

**जन्म**

१९६७: राम नरेश रावत भारतीय राजकारणी, उत्तर प्रदेशचे आमदार (निधन: ४ सप्टेंबर २०२२)

१९४९: गोपाल निमाजी वानवती भारतीय वकील आणि राजकारणी (निधन: २ सप्टेंबर २०१४)

१९४८: नित्यानंद हळदीपूर - मैहर घराण्याचे बासरी वादक

१९३२ : राज मोहन वोहरा लेफ्टनंट जनरल महावीरचक्र, परम विशिष्ट सेवा पदक (निधन : १४ जून २०२०)

१९२३ : आत्माराम गोविंद भेंडे - मराठी नाट्यअभिनेते व दिग्दर्शक

१९१२: पन्नालाल पटेल - गुजराथी कथा-कादंबरीकार - ज्ञानपीठ पुरस्कार (निधन: ६ एप्रिल १९८९)

**निधन**

२०२२: पार्थ घोष - पश्चिम बंगालचे वक्तृत्वकार

२००२: दुर्गाबाई भागवत - जेष्ठ लेखिका, तत्त्ववेत्या (जन्म: १० फेब्रुवारी १९१०)

२००१: विभावरी शिरूरकर - लेखिका (जन्म: १८ मार्च १९०५)

२००१ : प्रेम धवन - भारतीय गीतकार पद्मश्री (जन्म: १३ जून १९२३)

१९९८: ऍलन मॅक्लिओड कॉर्मॅक - दक्षिण आफ्रिकन-अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ - नोबेल पारितोषिक (जन्म: २३ फेब्रुवारी १९२४)

# शाहरुख खानच्या तब्येतीबाबत जुही चावलानं दिली हेल्थ अपडेट



अभिनेता शाहरुख खानची प्रकृती कालच अचानक बिघडली होती. उष्माघात झाल्यानं त्याला अहमदाबाद येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले . त्यानंतर शाहरुखच्या चाहत्यांना त्याच्या तब्येतीबाबत चिंता व्यक्त केली. शाहरुखची पत्नी गौरी आणि त्याची मैत्रिण जुही चावला यांनी रुग्णालयात जाऊन शाहरुखची भेट घेतली. अशातच आता जुहीनं शाहरुखच्या हेल्थबाबत अपडेट दिली आहे.

काय म्हणाली जुही?

शाहरुखच्या तब्येतीबद्दल जुही म्हणाली, “काल रात्री शाहरुखची तब्येत ठिक नव्हती, पण त्याची काळजी घेतली जात आहे आणि आता त्याला बरे वाटत आहे. तो लवकरच बरा होईल आणि जेव्हा आमची टीम अंतिम सामना खेळणार तेव्हा तो वीकेंडला स्टॅंडमध्ये टीमला सपोर्ट करेल. “

शाहरुखला झाला उन्हाचा त्रास

मंगळवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर IPL 2024 कोलकाता नाइट रायडर्स विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद या सामन्यादरम्यान उष्माघातामुळे शाहरुखला KD रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शाहरुखने त्याची मुलं सुहाना आणि अबराम, तसेच त्याची मॅनेजर पूजा ददलानी यांच्यासोबत मॅचला हजेरी लावली होती.

# मलेरियाच्या विरोधात लढण्यासाठी शास्त्रज्ञांनी विकसित केली नवीन लस, जेएनयू विद्यापीठाचे संशोधन

जगभरात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू हा मलेरिया आजारामुळे होतो. हा एक गंभीर आजार आहे. डासांमार्फत होणाऱ्या या आजारावर वेळीच उपचार नाही केले तर रूग्णाला मृत्यू येऊ शकतो. परंतु, या मलेरिया आजारावर नुकतीच एक लस शोधण्यात आली आहे.




दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील (JNU) शास्त्रज्ञांच्या टीमने ही मलेरियावरील लस विकसित केली आहे. ही लस मलेरियाविरूद्ध अधिक प्रभावी आणि आजाराला प्रतिबंध घालण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

सेल प्रेसच्या iScience एका जर्नलमध्ये त्यांचे संशोधन प्रकाशित करण्यात आले आहे. त्यांचे हे संशोधन लस विकसित करण्यासाठी परजीवी प्रोहायबिटिन प्रोटिनचे एक नवीन लक्ष्य म्हणून समोर आले आहे. मलेरिया हा आजार मादी ॲनोफिलीस डासाद्वारे पसरणारा एक वेक्टर-जनित रोग आहे.

या आजाराने आतापर्यंत लाखो लोकांचा बळी घेतला आहे. या आजारावर आतापर्यंत सतत संशोधन आणि प्रयत्न करण्यात आले आहे, तरी देखील जागतिक आरोग्य संघटनेच्या २०२२ च्या अहवालात जगभरात २४९ दशलक्ष प्रकरणे आणि 60 हजार ८०० मृत्यूंसह एक भीषण चित्र समोर आले आहे.

जेएनयू टीमने नेमके काय केले?

स्पेशल सेंटर फॉर मॉलिक्यूलर मेडिसनच्या जेएनयूमधील प्राध्यापिका शैलजा सिंह आणि प्राध्यापक आनंद रंगनाथन यांच्या नेतृत्वाखालील झालेल्या या संशोधनात एक नवीन होस्ट-परजीवी इंटरॅक्टिंग कॉम्प्लेक्स ओळखले आहे.

## राशि भविष्य

**मेष** तुमच्या इच्छा प्रत्यक्षात येण्यासाठी तुमचे विचार आणि ऊर्जा वापरा, केवळ कल्पनाविश्वात रमण्यात काहीही अर्थ नाही. तुम्ही केवळ विचार करता, प्रयत्न करत नाही हा तुमचा खरा प्रश्न आहे. संयुक्त प्रकल्पात आणि संशयास्पद आर्थिक योजनांमध्ये गुंतवणूक करू नका.

**वृषभ** कार्यालयातून लवकर बाहेर पडण्याचा प्रयत्न करा आणि ज्या गोष्टी तुम्हाला आवडतात त्याच करा. व्यापारात नफा आज बऱ्याच व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणू शकतो. आज तुम्ही कुणाला सल्ला दिलात तर -अन्य कुणाचा सल्ला घेण्याचीही तयारी ठेवा. काहीजणांना अनोखा नवा रोमान्स हमखास लाभेल.

**मिथुन** जर तुम्ही भूतकाळातील घटनांचा विचार करीत बसलात - तर तुमचे नैराश्य तुमच्या प्रकृतीवर परिणाम करील - शक्य तेवढे शांत राहण्याचा प्रयत्न करा. तात्पुरते कर्ज मागण्यासाठी आलेल्या लोकांकडे निव्वळ दुर्लक्ष करा. तुम्ही तुमच्या घरची कर्तव्ये बजावण्याकडे दुर्लक्ष केले तर तुमचा जोडीदार वैतागून जाईल.

**कर्क** मौज, मस्ती, मजा आणि करमणूकीचा दिवस. आजच्या दिवशी गुंतवणूक करणे टाळा. जुने मित्र आधार देतील आणि मदत करतील. आज दिवसभर तुम्ही आपल्या जोडीदाराच्या प्रेमाचा अनुभव घ्याल. आज खूप सुंदर दिवस आहे. तुम्ही तुमचं प्रेम व्यक्त केलंत तर तुमची प्रिय व्यक्ती आजच्या दिवशी साक्षात सौंदर्याची मूर्ती होऊन तुमच्या समोर येईल.

**सिंह** अत्यंत व्यस्त दिवस असला तरी आरोग्य चांगले राहील. आई -वडिलांच्या आरोग्यावर तुम्हाला आज अधिक धन खर्च करावे लागू शकते. यामुळे तुमची आर्थिक स्थिती बिघडेल परंतु, नात्यामध्ये मजबुती येईल. नातेवाईकांना भेट देण्याचा अनुभव तुम्हाला वाटला त्यापेक्षा बरा असेल.

**कन्या** शक्य असेल तर लांबचा प्रवास टाळणे चांगले. अशा प्रवासासाठी तुम्ही कमकुवत आहात, त्यामुळे हा प्रवास तुम्हाला आणखीनच कमकुवत बनवेल. या राशीतील जे लोक परदेशात व्यापार करतात त्यांना आज चांगला धन लाभ होऊ शकतो.

**तूळ** स्वत:ला चुस्त तंदुरुस्त ठेवण्यासाठी उच्च कॅलरी आहार टाळा. खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा - आणि फक्त महत्त्वाच्या आवश्यक गोष्टींचीच आज खरेदी करा. घरातील कुणी सदस्याच्या व्यवहाराने तुम्ही चिंतीत राहू शकतात. तुम्हाला त्यांच्याशी बोलण्याची आवश्यकता आहे.

**वृश्चिक** चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. या राशीतील मोठ्या व्यावसायिकांना आजच्या दिवशी खूप विचार करून पैसा गुंतवणूक करण्याची आवश्यकता आहे. सामाजिक एकत्रिकरण सोहळ्यात तुमच्या थट्टेखोरपणामुळे तुम्ही लोकप्रिय ठराल.

**धनु** आरोग्याच्या बाबतीत थोडीशी नाजूक बाब आहे, काळजी घ्या. अनोळखी कुणी व्यक्ती तुमच्या घरी येऊ शकतो त्यामुळे तुम्हाला सामान खरेदी करावे लागू शकते जे तुम्ही पुढील महिन्यात खरेदी करणार होते. आज तुमच्या कृतीमुळे तुमच्यासोबत राहात असलेली व्यक्ती प्रचंड त्रासून जाईल.

**मकर** थोडासा व्यायाम करून तुमचा दिवस सुरू करा - त्यामुळे तुमचे तुम्हालाच चांगले वाटेल - दररोज अशा प्रकारे दिवसाची सुरूवात करा. धनाने जोडलेल्या काही गोष्टींतून मार्ग निघू शकतो आणि तुम्हाला धन लाभ होऊ शकतो. तुम्ही पार्टी देण्याचा विचार करत असाल तर तुमच्या सर्वात चांगल्या मित्रांना बोलवा.

**कुंभ** तुमच्या भवतीच्या लोकांचा पाठिंबा मिळाल्याने तुम्ही आनंदी व्हाल. झटपट पैसा कमावण्याची तुम्हाला इच्छा होईल. आपल्या जोडीदाराच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केल्याचा तुमच्या नातेसंबंधावर परिणाम होऊ शकतो. आपला किंमती वेळ त्यांच्या बरोबर घालवा.

**मीन** ध्यानधारणा आराम मिळवून देईल. महत्त्वाच्या आर्थिक करारांच्या वेळी आकस्मिक विचार करून निर्णय घेऊ नका. तुमच्या मुलांच्या बाबत काळजी व्यक्त करून पाठिंबा देणे महत्त्वाचे ठरेल. लवमेट आज तुमच्या कडून कुठल्या गोष्टीची डिमांड करू शकतो परंतु, तुम्ही त्याला पूर्ण करू शकणार नाही ज्यामुळे तुमचा लवमेट तुमच्याशी नाराज होऊ शकतो.

# झाडाणी भूखंडप्रकरणी कारवाईसाठी स्थानिक ग्रामस्थांनी दिला आंदोलनाचा इशारा

● सातारा : झाडाणी (ता. महाबळेश्वर) येथील वडिलोपार्जित जमिनी बळकवल्या प्रकरणी गुजरात राज्याचे मुख्य जी.एस.टी. आयुक्त चंद्रकांत वळवी यांच्यावर गुन्हा दाखल करून मूळ मालकांना जमिनी परत करण्यात याव्यात. सातारा जिल्हाधिकाऱ्यांनी याप्रकरणी ९ जूनपर्यंत कारवाई करावी अन्यथा १० जूनपासून उपोषणास बसणार असल्याचा इशारा झाडाणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाव्दारे दिला आहे.

या निवेदनावर झाडाणी परिसरातील खातेदार आणि त्यांच्या ५० वारसदारांच्या सह्या आहेत. महाबळेश्वर तालुक्यातील झाडाणी येथील ग्रामस्थ खोपोली (जि. रायगड) येथे १९८० सालापासून स्थलांतरीत आहेत. १९६० साली कोयना धरणासाठी कोयना, कांदाटी या भागातील गावांचे पुनर्वसन झाले. त्यावेळी या भागातील गावाचे पुनर्वसन झाले. त्यावेळी आमच्या झाडाणी गावालाही नोटीस बजावली होती. आमचे गाव शेवटच्या टोकाला आहे. डोंगरावर असल्याकारणाने तेथे दळणवळण करणे शक्य नव्हते. दरम्यान पुनर्वसन झाल्यावर आम्हाला शासनाचा कोणताही मोबदला मिळाला नाही. आमचे गाव हे अतिदुर्गम भागात असल्याकारणाने तेथे दळणवळणाचे कोणतेही साधन उपलब्ध नव्हते. अति पाऊस आणि हिंस्र श्वापदांच्या त्रासामुळे, भितीमुळे नाईलाजास्तव घरदार व जमीन, जुमला सर्व काही सोडून मुलाबाळांसह पोट भरण्यासाठी रायगड या ठिकाणी घरापुरती जमीन घेऊन मोल मजुरी करून जीवन जगत आहोत.

त्या ठिकाणी जमीन, जागा सोडून आल्याची माहिती मिळताच स्थानिक जमीन दलालांनी नवीन वस्तीचा पत्ता शोधून ग्रामस्थांना जमीन विकता का? असे विचारल्यानंतर ग्रामस्थांनी जमीन विकण्यास नकार दिला. त्यानंतर एजटांनी स्थानिक भूमिपुत्रांनी जमीन विकावी यासाठी प्रयत्न केला.

जमीन विकली नाही तर ती जमीन शासन जमा होईल. त्यापेक्षा ती जमीन विकून त्या जमिनीचा मोबदला घ्या, अशी भीतीं ग्रामस्थांच्या मनात निर्माण केली. त्या भितीपोटी गावातील काही ग्रामस्थ जमीन विकण्यासाठी तयार झाले. काही ग्रामस्थ अशिक्षित असल्याकारणाने ग्रामस्थांची दिशाभूल करून फसवणूक करण्यात आली होती .ही जमीन चंद्रकांत वळवी, जिल्हा नंदुरबार आणि त्यांचे नातेवाईक यांच्या नावे करण्यात आली. ज्या ग्रामस्थांचा विरोध होता त्या ग्रामस्थांना वकिलामार्फत खोटया नोटीसी पाठवून जमीन विकण्यास भाग पाडले. अशी ग्रामस्थांनी तक्रार केली.

श्री. चंद्रकांत वळवी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केले परंतु आम्हाला त्यांनी जुमानले नाही. या जमिनीमध्ये हनुमान मंदिर तसेच ग्रामदैवत श्री लव्हेश्वर मंदिर सर्व्हे नंबर १२ मध्ये आहे. या मंदिराकडे जाण्यासाठी रस्ता चंद्रकांत वळवी यांनी ठरल्याप्रमाणे ठेवला नाही. मंदिर हे पुरातन असल्यामुळे वंशपरंपरेने त्याची पुजाअर्चा होणे तसेच माहेरवासिनेचे नारळ किंवा ओटी भरणे तसेच नित्य देवपुजा यासाठी रायगड जिल्हयामधून ग्रामदैवतेच्या मंदिरामध्ये वर्षातुन एक ते दोन वेळा येत असतो. मात्र संबंधित चंद्रकांत वळवी, त्यांचे परिवार धाकधपटशाही आणि दांडगाईने संबंधित जागेमध्ये आणि मंदिरामध्ये प्रवेश करू देत नाहीत, त्यामुळे आमच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. असे आता स्थानिक भूमिपुत्र सांगू लागलेले आहेत.



सर्व्हे नंबर १२ लगत श्री लव्हेश्वर ईनामी जमीन १७० एकर आणि वहिवाटी नावे सामूहिक जमीन आहे. तरी ग्रामस्थांना या क्षेत्रात जाण्या-येण्याकरता चंद्रकांत वळवी व नातेवाईक यांच्या जागेतून रस्ता होता परंतु ग्रामस्थांना फसवून या वहिवाटी रस्त्यावर पाबंदी घालण्यात आली असून त्या क्षेत्रातून जाण्या-येण्यास बंदी घातली आहे.

या ठिकाणी जायचे असल्यास दोडाणी या गावात वाहने उभी करून चार ते पाच किलोमिटर पायी चालत जावे लागते आणि तेही त्यांच्या नोकरदारांना विचारून पायी जाऊ शकतो. श्री. चंद्रकांत वळवी यांनी एकदा स्थानिक भूमिपुत्रांशी संपर्क साधला नाही. या एजंटने ग्रामस्थांची फसवणूक करून पॉवर ऑफ ऑटर्नी नावे करून संपूर्ण जमीन हडपली आहे. सर्व ग्रामस्थांची फसवणूक केली आहे. या एजंटने काही जमिनीचा मोबदला न देता पूर्णपणे जमीन मूळ मालकाच्या नावे केली. तरी याविषयी योग्य ती चौकशी करून न्याय मिळवून द्यावा. या प्रकरणात कायद्याचे उल्लंघन झाले असून गंभीर गुन्हा झाला आहे. सर्व कागदपत्रे बोगस बनवून दिशाभूल करून जमिनी खरेदी केल्या आहेत. ज्या जमीनींचे खरेदीपत्र झालेले आहे. त्यांचे सर्व कागदपत्र पडताळून एस.आय.टी .मार्फत चौकशी व्हावी, त्यामुळे मयत असणाऱ्या व्यक्तींच्या नावे खरेदीपत्र कसे झाले. त्याचबरोबर खरेदीपत्र करणारे दुय्यम निबंधक, एजंट, दस्त लेखनिक तसेच या दस्तऐवजाची नोंद करणारे तत्कालीन तलाठी, सर्कल, तहसालदारांची खातेनिहाय चौकशी करावी आणि वंशपंरपरागत असलेली जमीन आम्हाला परत मिळावी, तसेच पुरातन श्री लव्हेश्वर मंदिर येथे जाण्यासाठी व पुजा अर्चा करण्यासाठी रस्ता तातडीने मिळावा. गावठाणातील आमची जागा सातबाराप्रमाणे आम्हांला परत मिळावी. आम्हाला तेथे शेती आणि राहण्यासाठी तसेच उपजीविका करण्यासाठी परवानगी मिळावी, ही कारवाई दि. ९ जूनपर्यंत प्रशासनाने करावी अन्यथा सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांच्याबरोबर सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झाडांनी गावचे ग्रामस्थ उपस्थित निवेदनाद्वारे दिलेला आहे सदर निवेदनाची प्रत निवासी उपजिल्हाधिकारी श्री नागेश पाटील यांना देण्यात आलेली आहे.

■ वीस वर्षे पूर्वी या जमिनीचा व्यवहार झाला असला तरी आतापर्यंत महसुली अधिकारी म्हणून ज्या ज्या अधिकाऱ्यांचा व पोलीस यंत्रणेचा सहभाग आहेत त्या सर्वांची चौकशी व्हावी अशी मागणी आता स्थानिक ग्रामस्थांनी केलेले आहे दरम्यान या प्रकरणाची माहिती काही कार्यकर्त्यांना मिळाली पण त्याबाबत ठोस पावले उचलले नसल्याने आता सामाजिक कार्यकर्ते श्री सुशांत मोरे यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा करून स्थानिक झाडाणी ग्रामस्थांना दिलासा देत आहेत.

■ सध्या हा देशभर चर्चेचा विषय ठरलेला आहे. आचारसंहिता असल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार हे भूमिका घेत नाहीत .परंतु, आचारसंहिता उठल्यानंतर या प्रकरणाबाबत चांगलेच राजकारण होईल .असे चिन्ह दिसू लागलेले आहे.

## कुणबी समाज ग्रुप नं ४ चे वार्षिक अधिवेशन संपन्न



● तळा - दि.22/05/2024 रोजी कुणबी समाज ग्रुप क्रमांक 4 निगुडशेत विभाग यांचे अधिवेशन श्री.रवींद्र मांडवकर यांच्या अध्यक्षतेखली बारपे येथे संपन्न झाले. सचिव श्री सुनील बैकर सर यांनी उपस्थितांचे स्वागत केले त्यानंतर बारपे ग्रामस्थ यांनी शाल व पुष्प गुच्छ देवून स्वागत केले.

पहिल्या सत्रात अहवाल वाचन. जमा खर्च अहवाल वाचन व चर्चा करण्यात आली. सर्वांना वार्षिक जमाखर्च अहवाल प्रिंट देण्यात आला . या वर्षी प्रथमच 3 तासाचे विचार प्रबोधन व मार्गदर्शन शिबिर कार्यक्रम घेण्यात आले. जितेंद्र भोसले सर कर्नाळा यांनी ओबीसी जतनिहाय जनगणना --- गरज या विषयावर व्याख्यान दिले .त्यानंतर सल्लागार तथा जेष्ठ पत्रकार कृष्णा भोसले ,.श्री तुकाराम पाटेकर श्री सरफले महाराज श्री.दुर्गुळे श्री.संतोष आमले श्री सचिन कदम श्री कांतीलाल कसबले श्री.राणे सर श्री .कृष्णा चाळके श्री सुनील बैकर सर व श्री रवींद्र मांडवकर यांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले. महिलांचा उत्तम प्रतिसाद लाभला .

या नंतर चालू वर्ष कर्जवसुली जमा रक्कम याचे वाचन करण्यात आले. व सकाळ सत्र संपले. भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात होती.

सत्र 2 मध्ये विविध सामाजिक विषयावर चर्चा प्रश्नोत्तरे घेण्यात आली . अध्यक्षांनी सर्व प्रश्न समजून घेतले .योग्य उत्तरे दिली. त्यानंतर कर्ज वाटप करण्यात आले. आभार प्रदर्शन करून अधिवेशन संपले. एक नवीन दिशा सापडल्याचे समाधान झाले.

## मुंबईतील पब, नाईट क्लब, बार आणि हुक्का पार्लर्सचे ऑडिट करण्यात यावे ॲड.अमोल मातेले यांची मागणी



● मुंबई - मुंबईतील सर्व अनधिकृत बार, नाईट क्लब, पब, नाईट क्लब, बार आणि हुक्का पार्लर्सविरुद्ध ऑडीट करून पुढील कारवाई तात्काळ करावी, अन्यथा राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या वतीने नियमबाह्य सुरु असलेल्या ह्या सर्व ठिकाणांना टाळे लावा आंदोलन सुरु करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे मुंबई अध्यक्ष अमोल मातेले यांनी दिला आहे .

मातेले यांनी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी जी व मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर जी यांना ई-मेल द्वारे पत्र पाठवून हा इशारा दिला आहे.पुणे हिट अँड रन प्रकरणामुळे महानगरांमधील पब, नाईट क्लब, बार आणि हुक्का पार्लर्समध्ये नियमांची पायमल्ली होत असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे.

देशाची आर्थिक राजधानी मुंबईत अनधिकृत जागांवर बांधण्यात आलेले अनेक बार, नाईट क्लब, पब, नाईट क्लब, बार आणि हुक्का पार्लर्स पहाटेपर्यंत सुरु असतात, त्यातून बाहेर पडणारे तळीराम नशेधुंद अवस्थेत बेदरकारपणे त्यांची वाहने हाकत असतात. असे राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मुंबई अध्यक्ष ॲड.अमोल मातेले यांनी सांगितले. लोअर परेल कमला मिल परिसरात असलेले अनेक नाईट क्लब रात्री सुटल्यानंतर तेथे रस्त्याच्या दुतर्फा लांबचलांब वाहनांच्या रांगा लागून कर्कश होर्न वाजवत असल्याने त्याचा त्रास सामान्यांना सोसावा लागत आहे. असेच चित्र मुंबईच्या वांद्रे (प), जुहू,खार,सांताक्रूझ (प), साकीनाका, ओशिवरा, अंधेरी, मालाड, दहिसर याभागात दिसून येते.

■ मुबईतील अनेक नाईट क्लब, बार, पब आणि हुक्का पार्लर यांना मुंबई महानगर पालिकेच्या व अग्निशमन विभागाच्या परवानग्या नाहीत. यातील अनेक हुक्का पार्लर आणि पब हे इमारतींच्या टेरेसवर सुरु आहेत. ह्या सर्व अनधिकृत प्रकारांना मुंबई पोलीस आणि मुंबई महानगर पालिकेचा वरदहस्त आहे. पहाटे उशिरापर्यंत नियमबाह्य सुरु आलेले सर्व हुक्का पार्लर, क्लब, पब आणि बार यांच्याविरुद्ध वेळेत कारवाई झाली नाही तर पुण्यात झालेल्या प्रकारची पुनरावृत्ती होत राहील

■ मुंबईतील सर्व अनधिकृत बार, नाईट क्लब, पब, नाईट क्लब, बार आणि हुक्का पार्लर्सविरुद्ध ऑडीट करून पुढील कारवाई तात्काळ करावी, अन्यथा राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या वतीने नियमबाह्य सुरु असलेल्या ह्या सर्व ठिकाणांना टाळे लावा आंदोलन सुरु करण्यात येईल आणि उद्धवणाऱ्या कायदा सुव्यवस्थेची जबाबदारी आपली राहील असा इशारा ॲड मातेले यांनी दिला.

## Mumbai's water stock dips to 10% – lowest in three years



● Mumbai's overall water stock dipped to 10 per cent on Thursday – the lowest level recorded in the past three years – as per Brihanmumbai Municipal Corporation (BMC) records. According to BMC data, Mumbai's water stock stood at 10.28 per cent on May 23. On the same day in 2023, the city's water stock stood at 15.99 per cent; in 2022, it was 20.63 per cent.

The current water stock is adequate to last till July 31 and the usage and method of deployment of the water supply has been planned systematically by the BMC. However, a review of the water stock will be taken again in the first week of June," a civic official said. Earlier this month, the state government's irrigation department had approved the BMC's request to use a reserve water stock of 1.37 lakh MLD from Bhatsa Dam and 91,130 lakh MLD from Upper Vaitarna Dam.

"Monsoon in Mumbai is expected to arrive by the first or second week of June…so going by this, we have adequate stock that will last us till the arrival of monsoon. As a result, there is no provision of announcing a water cut at this moment and the monsoon forecast is also very good," the official added.

## If INDIA bloc wins, L-G will be yours: Kejriwal to Delhi voters

● Delhi Chief Minister Arvind Kejriwal Wednesday promised full statehood and "Delhi's own Lieutenant Governor" if the INDIA bloc forms the government at the Centre.

Speaking at a nukkad sabhas (public rallies) in the New Delhi constituency, Kejriwal said that the law and order situation in Delhi had deteriorated and that after June 4 (declaration of poll results), the police would listen to the people of Delhi.

Statehood for Delhi has been a sustained demand of the Aam Aadmi Party (AAP) since its formation in 2012. The BJP and Congress, in the past, have also raised the same demand with the Centre and in its manifestos, but have not made it a poll issue since AAP won the assembly elections in 2015.



Kejriwal's comments also come in the backdrop of the most combative relationship an elected Chief Minister has had with the Lieutenant Governor in Delhi to date.

"On June 4, the INDIA bloc government is going to be formed. The AAP will be a part of it. Your party will also be a part of the Centre. The first thing we will do is get full statehood status for Delhi. Then the L-G of Delhi will be yours. When your person will be your L-G, they will not stop work, but will run around to get your work done. After that, we will fix law and order of Delhi. It has deteriorated a lot. If you go to the police station, the police do not listen to you; after 4 June, the police will also listen to you," he said.

The rallies in the constituency, where AAP's Somnath Bharti is up against BJP's Bansuri Swaraj, were organised in Malviya Nagar, R K Puram, Kasturba Nagar, Kidwai Nagar, and R K Ashram.


While Bharti is a three-time MLA from Malviya Nagar, this will be Swaraj's first election. She, however, is a popular figure, talking about her mother, former union minister and Delhi's first woman Chief Minister Sushma Swaraj in her poll speeches.

ejriwal, meanwhile, said the country needs a Prime Minister who can address inflation and unemployment but these issues were being ignored by Prime Minister Narendra Modi.

"I went to Punjab, Haryana's Kurukshetra, Lucknow, Maharashtra's Bhiwandi, Mumbai and Jamshedpur. Everywhere people are suffering from inflation. People have lost their jobs. They are very angry. The public has made up its mind. PM Modi's government is not being formed on June 4… We want a Prime Minister who solves our problems and takes our country on the path of progress," he said.

## वन्यप्राणी गणनेबाबत वनखात्याने गांभीर्य ठेवावे

● छत्रपती संभाजीनगर - औट्रमघाट गौताळा अभयारण्य निसर्ग निर्मित आहे.जैव विविधता टिकवण्यासाठी अभयारण्याचे संवर्धन झाले पाहिजे व वन्यप्राणी गणना गांभीर्याने होण्याची गरज आहे, असे मत मानद वन्यजीव रक्षक डॉ. किशोर पाठक यांनी बुधवारी (ता.२२) व्यक्त केले. दरवर्षी मे महिन्यात बौद्ध पौर्णिमेला वन्यप्राणी गणना होते. यंदाही अभयारण्यातील २७ पाणस्थळांवर निसर्ग अभ्यासकांनी प्रगणनेत सहभाग घेतला. तत्पूर्वी हिवरखेडा नाका येथे डॉ. पाठक यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले.



प्रास्ताविकात सहायक वन्यजीव संरक्षक विशाल लोंढे म्हणाले की, उन्हाळयात पाणस्थळे मर्यादित होतात. २४ तासांतून एकदा का होईना वन्यप्राणी पाण्यासाठी पाणस्थळांवर येतात. बौद्ध पौर्णिमेला चंद्र मोठा व आकाश निरभ्र असते. त्यामुळे वन्यप्राण्यांचे निरीक्षण स्पष्टपणे करता येते. कन्नड परिमंडळात अकरा व नागद सात व पाटणा जंगलातील सात पाणस्थळांवरील मचाणावर सत्तावीस प्राणी निरीक्षक प्राणी गणनेत सहभागी झाले आहेत.

### डॉ. पाठक यांनी व्यक्त केली खंत

यावर्षी वन्यजीव विभागाने 'पाणस्थळांवर निरीक्षण व निसर्ग अनुभव कार्यक्रम' असे नाव या मोहिमेला दिले आहे. याबद्दल डॉ. पाठक यांनी खंत व्यक्त करत म्हणाले की, वन्यप्राणी गणना किमान निसर्गाचा अभ्यास असलेल्यांनाच सहभागी करून घेतले पाहिजेत. ज्यांना कोल्हा व लांडग्यातला फरक कळत नाही ते प्रगणना करतील, तर निसर्ग सहल आणि वन्यप्राणी गणना यात तो फरक आहे? वन्यप्राणी गणनेतील गांभीर्य वनविभागाने राखावे, असे आवाहन त्यांनी केले.


## Pune Porsche Crash: Here's what we know so far

● On May 19, a Porsche allegedly driven by a 17-year-old boy collided with a motorcycle, killing two in Pune's Kalyani Nagar. According to the police, the juvenile was reportedly intoxicated at the time of the incident.



As the case garners national attention, allegations have been made over leniency by the Juvenile Justice Board — which initially gave bail to the minor, asking him to write an essay on the incident. The JJB revoked the bail on Wednesday night, remanding the minor to the Yerawada home, located on the same premises as the JJB, until June 5.

## थोडक्यात



### जीव वाचवण्यासाठी आलेली SDRF ची बोट उलटली! नगरच्या प्रवरा नदीत तिघांचा मृत्यू तर दोघांचा शोध सुरु

● अहमदनगर, प्रतिनिधी:

उजनी धरणातील बोट दुर्घटना ताजी असताना आता अकोलेमधील अहमदनगर-प्रवरा नदीत एसडीआरफची बोट उलटली आहे. यामध्ये तिघांचा मृत्यू झाला आहे. एका बुडालेल्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी एसडीआरफ पथकाची बोट उलटली. या बोट दुर्घटनेत ५ जण बुडाले. तिघांचा मृत्यू झाला तर दोघांचा शोध सुरु आहे.

पथकातील चार जणांसह एक स्थानिक बोटीत बुडाला. अकोले तालुक्यातील सुगाव गावा जवळची ही घटना आहे. यामध्ये SDRF पथकातील तिघांचा मृत्यू झाला.

काल प्रवरा नदीत दोन तरुण बुडाले होते. एकाचा मृतदेह सापडला तर दुसऱ्याचा होता शोध सुरू होता. दरम्यान शोध कार्यासाठी आज SDRF च्या पथकाला पाचारण करण्यात आले होते. मात्र बोट उलटल्याने SDRF पथकातील तिघांचा मृत्यू झाला.

### करवीरचे आमदार पी.एन पाटील यांचे निधन बाथरूमध्ये पडल्याने डोक्याला झाली होती गंभीर दुखापत

● कोल्हापूर, प्रतिनिधी:



कोल्हापूर जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि करवीर विधानसभा मतदारसंघाचे आमदार पी. एन. पाटील आज पहाटे निधन झाले. ते 71 वर्षांचे होते. आमदार सतेज पाटील यांनी फेसबुक पोस्ट करत याबाबत माहिती दिली. रविवारी बाथरूममध्ये पडल्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. तसेच मेंदूमध्ये रक्तस्त्राव झाला होता. गेल्या चार दिवसांपासून त्यांच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते.

पी.एन पाटील यांच्या निधनावर दु:ख व्यक्त करत आमदार आणि कोल्हापूर काँग्रेसचे अध्यक्ष सतेज पाटील यांनी फेबुकवर पोस्ट करत आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, "काँग्रेसचे निष्ठावंत, कोल्हापूर जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष, करवीर विधानसभा मतदारसंघाचे आमदार पी. एन. पाटील यांच्या निधनाची वार्ता अत्यंत दु:खद आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. आम्ही त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहोत.

# नवनवीन संकल्पना राबवून प्रशासनातील अधिकाऱ्यांनी राज्याच्या विकासात योगदान द्यावे - राज्यपाल रमेश बैस

● सातारा, प्रतिनिधी:



प्रशासनातील अधिकाऱ्यांनी नवनवीन संकल्पना राबवून राज्याच्या विकासात योगदान द्यावे, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

महाबळेश्वर येथे राज्यपाल रमेश बैस यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी राज्यपाल यांच्या सहसचिव श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्य अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे ,अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल, उपवनसंरक्षक आदिती भरद्वाज, जलसंपदा विभागाचे अरुण नाईक, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. युवराज करपे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सातारा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्प, उपक्रम यांचा सखोल आढावा घेत असताना राज्यपाल श्री. बैस यांनी शिक्षण, आरोग्य, पर्यटन विकास, बांबू लागवड अदीविषयांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पायाभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांचा शैक्षणिक गुणवत्ता विकास यासाठी राबविण्यात येत असलेल्या मॉडेल स्कूल या उपक्रमाबाबत माहिती घेत असताना श्री. बैस यांनी जिल्हा परिषदेच्या शाळांची वर्गवारी ही उपलब्ध पायाभूत सुविधांच्या आधारे करत असतानाच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारेही करावी. यामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा विकास करण्यासाठी पूरक वातावरण निर्माण करावे. त्यासाठी शाळांच्या स्पर्धा आयोजित कराव्यात. ज्या शाळा चांगली कामगिरी करतील त्यांना शासनामार्फत पुरस्कार देण्यात यावेत, असे सांगितले.


या उपक्रमाबाबत बारकाईने जाणून घेत असताना त्यांनी मॉडेल स्कूलच्या निर्मितीसाठी येणारा खर्च, जिल्ह्यातील एक शिक्षकी शाळांची संख्या, शाळांमध्ये प्रयोगशाळा, संगणक लॅबची उपलब्धता आदींबाबत माहिती घेतली. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजनाचा दर्जा तपासणी नियमितपणे व्हावी व विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे मध्यान्ह भोजन मिळेल याबाबत दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. सध्याच्या काळात मुलांच्या शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. मैदानी खेळांमधील सहभाग कमी झाला आहे. त्यामुळे शाळांमध्ये मुलांच्या क्रीडा विकासावर जाणीवपूर्वक भर देण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

जिल्ह्यात मुबलक प्रमाणावर दगड उपलब्ध आहेत अशा वेळी एखादी अंगणवाडी संपूर्णतः दगडी बांधकामाची अशी तयार करण्यात यावी. जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर टसर सिल्क प्रकल्प राबविण्यात येत आहे. यात सहभागी असणाऱ्या शेतकऱ्यांना सिल्क धागा तयार करण्यासाठी प्रोत्साहन व प्रशिक्षण देण्यात यावे. बांबूपासूनही धागा तयार करण्याच्या दृष्टीने प्रकल्प राबवावेत, अशा सूचना राज्यपाल श्री.बैस यांनी यावेळी दिल्या.

या बैठकीत जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डुडी यांनी जिल्ह्याचा संपूर्ण आढावा सादर केला. यामध्ये जिल्ह्यात राबविण्यात येत असणारा मॉडेल स्कूल या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाबरोबरच स्मार्ट पीएचसी ,जिल्ह्याचा एकात्मिक धार्मिक, ऐतिहासिक, पर्यावरण पूरक पर्यटन विकास आराखडा, बांबू लागवड उपक्रम, अभिनव अंगणवाडी, टसर सिल्क उत्पादन प्रकल्प, आदींबाबत सविस्तर माहिती दिली. पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी पोलीस विभागाच्या कामकाजाबाबत माहिती दिली.

■ जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी एकात्मिक धार्मिक, ऐतिहासिक, पर्यावरण पूरक पर्यटन विकास आराखडा राबविण्यात येत असून यामधून किल्ल्यांचा विकास करत असताना अर्काइव्हलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाची मदत घेण्यात यावी, अशी सूचना राज्यपाल श्री. बैस यांनी केली. जिल्ह्यातील प्रायोगिक तत्त्वावर करण्यात येत असलेल्या बांबू लागवडीचा आढावा घेत असताना श्री. बैस म्हणाले, बाजारपेठेच्या दृष्टीने किफायतशीर ठरणाऱ्या बांबूच्या प्रजातींची लागवड करावी. बांबूपासून असंख्य प्रकारच्या वस्तू तयार करण्यात येतात. याचे व्यावसायिक प्रशिक्षण स्थानिकांना देऊन त्यांचा उत्पन्न स्तर वाढविण्यासाठी प्रयत्न केले जावेत. पावसाळ्यापूर्वी शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना फळ रोपे, शेवगा यासारखी रोपे मोफत उपलब्ध करून द्यावीत. शेतकऱ्यांनी या रोपांची लागवड करून त्यांचे संगोपन करावे व त्यापासून मिळणारे उत्पन्न हे शेतकऱ्यांनाच देण्यात यावे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी उजाड माळराने आहेत. त्या ठिकाणी अशाप्रकारे वृक्ष लागवडीचे सूक्ष्म नियोजन करण्यात यावे.

## देवानेच मला पाठवलंय, कारण माझ्यातील शक्ती ही दैवी आहे; पंतप्रधान मोदी यांचे वक्तव्य



● नवी दिल्ली, प्रतिनिधी:

देवानेच मला पाठवलं आहे. कारण, माझ्यामधील शक्ती ही साधारण नाही ती देवानेच मला दिलीये असं वाटतं, असं वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नरेंद्र मोदी यांनी 'न्यूज१८' ला मुलाखत दिली होती. यावेळी त्यांनी हा दावा केलाय. यासंदर्भातील एक व्हिडिओ व्हायरल होत असून लोकांच्या त्यावर मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया येत आहेत.

पंतप्रधान मोदी मुलाखतीत म्हणतात की, 'माझी आई जोपर्यंत जिवंत होती तोपर्यंत मला वाटायचं मी तिच्या पोटीच जन्म घेतलाय. पण, तिच्या निधनानंतर, मला विश्वास वाटायला लागला की माझ्यातील शक्ती ही साधारण नाही. देवानेच खास शक्ती देऊन मला पाठवलं आहे. माझ्याकडून काही तरी करून घेण्यासाठी त्याने मला पाठवलं आहे.'

ही शक्ती केवळ एका साधारण शरीरात असू शकत नाही. पण, देवानेच माझ्यावर कृपा केली आहे. मला वाटतं देवाने काहीतरी चांगलं करण्यासाठी मला क्षमता, प्रेरणा दिली आहे. मी केवळ एक साधन आहे. त्यामुळे मी जे काही करत आहे, ते देवानेच मला करायला सांगितलंय असं मी मानतो, असं मोदी म्हणालेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचार सभांचा धडाका लावला आहे. त्यांची ऊर्जा अनेकांना लाजवणारी आहे. याच पार्श्वभूमीवर मोदी यांना पत्रकाराने प्रश्न विचारला होता. २०१९ पेक्षा २०२४ मध्ये पंतप्रधान मोदी यांच्यामध्ये जास्त ऊर्जा दिसत आहे असं पत्रकार म्हणाला. यावर बोलताना मोदींनी ही दैवी शक्ती असल्याचा दावा केला. ते असंही म्हणाले की, कम्युनिस्ट लोक मला वेड्यात काढतील. पण, मला तर असंच वाटतं. मी चुकीचा असू शकतो. पंतप्रधान मोदी सलग तिसऱ्यांदा सत्तेत येण्यासाठी प्रयत्नशील आहेत. यासाठी ते जोरदार प्रयत्न करत आहेत. त्यांनी अनेक माध्यमांना मुलाखती दिल्या आहेत. ७३ वर्षीय नरेंद्र मोदी गेल्या १० वर्षातील आपल्या कामाचा लेखाजोखा लोकांच्या समोर ठेवत आहेत. लोक त्यांना पुन्हा संधी देण्याती शक्यता आहे.

## फॉर्म 17C नुसार मतदानाची आकडेवारी जाहीर केल्यास मतदारांमध्ये गोंधळ निर्माण होईल

● नवी दिल्ली, प्रतिनिधी:

**ECI चे सुप्रीम कोर्टात शपथपत्र**




केंद्रीय निवडणूक आयोगाने बुधवारी सुप्रीम कोर्टामध्ये शपथपत्र सादर केले आहे. यामध्ये आयोगाने असा दावा केलाय की, फॉर्म 17C नुसार मतदानाची आकडेवारी उघड करण्यामुळे मतदारांमध्ये गोंधळ निर्माण होऊ शकतो. फॉर्म 17C नुसार प्रत्येक मतदान केंद्रावर झालेल्या मतदानाची आकडेवारी पाहता येते. यामध्ये पोस्टद्वारे केलेल्या मतदानाचा देखील समावेश असतो. प्रत्येक मतदान केंद्रावरील अंतिम अधिकृत डेटा जाहीर करा, कारण तो कायदेशीर अधिकार आहे, असा दावा कोणाला करता येणार नाही, असंही निवडणूक आयोगाने शपथपत्रात स्पष्ट केलं आहे. फॉर्म 17C वेबसाईटवर अपलोड करणे योग्य ठरणार नाही. कारण, या फोटोंचा चुकीच्या पद्धतीने वापर केला जाऊ शकतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात लोकांमध्ये अस्वस्थता आणि अविश्वास निर्माण होईल, असंही आयोगाने म्हटलंय.

निवडणूक निकालामध्ये खूप कमी मतांनी एखाद्याचा विजय होऊ शकतो. अशा स्थितीमध्ये फॉर्म 17 ची माहिती उघड केल्यास मतदारांमध्ये गोंधळ निर्माण होऊ शकतो. कारण, फॉर्म 17 मध्ये पोस्टाद्वारे केलेल्या मताचा देखील समावेश असतो.

## एका प्रवेशासाठी शाहीद घ्यायचा एक लाख

### कार्यालयात आढळले पालकांच्या अर्जासहीत धनादेश

● नाशिक , प्रतिनिधी:



आरटीई प्रवेशासाठी बोगस कागदपत्रे वापरल्या प्रकरणी मुख्य सूत्रधार शाहीद शरीफ याच्या कार्यालयावर धंतोली आणि सीताबर्डी पोलिसांनी छापा टाकला. या छाप्यात पोलिसांना पालकांकडून घेतलेले धनादेश आणि आरटीई प्रक्रियेत भरलेले अर्ज सापडले. शाहीद शरीफ आरटीईअंतर्गत एका प्रवेशासाठी एक ते दीड लाखांपर्यंत पैसे घेत असल्याची माहिती पोलिस सुत्रांनी दिली. विशेष म्हणजे, जाफरनगर येथील घरात तपासणी केल्यावर पोलिसांना तलवार सापडली असून त्याविरोधात गिट्टीखदान पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## एसटीच्या आरक्षणात तीन लाखांची वाढ

### गेल्या वर्षीच्या तुलनेत तिकीट विक्रीला उदंड प्रतिसाद



● मुंबई , प्रतिनिधी:

राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) अद्ययावत ऑनलाइन आरक्षण प्रणाली यंदा १ जानेवारीपासून सुरू झाली आहे. या प्रणालीला प्रवाशांचा उदंड प्रतिसाद मिळत असून १ जानेवारी ते २० मे पर्यंत १२ लाख ९२ हजार तिकिटांचे आरक्षण झाले आहे. गेल्या वर्षी याच काळात नऊ लाख ७५ हजार तिकिटाचे आरक्षण झाले होते. गेल्या वर्षाच्या तुलनेत ही संख्या सुमारे तीन लाखांनी जास्त आहे.

प्रवाशांना घरबसल्या तिकिट उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एसटीने अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन तिकीट आरक्षण करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. मोबाईल ॲपच्या माध्यमातूनदेखील प्रवाशांना तिकीट काढता येते. ही दोन्ही माध्यमे १ जानेवारी २०२४ पासून अद्ययावत करण्यात आली. जुन्या प्रणालीतील अनेक त्रुटी काढून टाकल्याने ऑनलाइन आरक्षणप्रणाली प्रवाशांना वापरण्यास अत्यंत सोपी व सुलभ झाली आहे. या अद्ययावतीकरणामुळे प्रवाशांकडून दररोज दहा हजार तिकिटे आरक्षित केली जात असल्याची आकडेवारीही समोर आली आहे.

या दोन्ही प्रणालीद्वारे प्रवाशांना अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला सन्मान योजना, दिव्यांग व्यक्ती अशा विविध सवलतींचेदेखील आगाऊ आरक्षण मिळू शकते, असे महामंडळाने सांगितले आहे.

## अकरावी प्रवेशासाठी शुक्रवारपासून अर्ज स्वीकारणे सुरू

● नाशिक , प्रतिनिधी:

इयत्ता बारावीपाठोपाठ येत्या काही दिवसांतच दहावीच्या परीक्षेचा निकालदेखील जाहीर होण्याची शक्यता आहे. तत्पूर्वीच नाशिक महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांकरिता ऑनलाइन केंद्रीभूत प्रवेशप्रक्रिया सुरू होणार आहे. शुक्रवार (ता. २४)पासून अकरावी प्रवेशासाठी अर्जाचा भाग एक भरण्याची प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राज्यातील प्रमुख महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये गेल्या काही वर्षांपासून अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन केंद्रीभूत प्रवेशप्रक्रिया राबविली जात आहे.

## शेणखताला आले 'सोनेरी दिवस'



● छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी:

मागील काही वर्षांपासून शेतकऱ्यांनी शेतमालाचे उत्पादन वाढविण्याच्या नादात शेतामध्ये रासायनिक खतांचा उपयोग वाढविला आहे. त्यामुळे पिकांचा लागवड खर्च वाढला असून उत्पादन मात्र घटत चालले आहे.

रासायनिक खतामुळे जमिनीचा पोत खालावल्याने शेतकऱ्यांना नवीन समस्येला तोंड द्यावे लागत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी शेतकरी आता पूर्वीप्रमाणे शेणखताच्या वापरावर भर देत आहेत. एकीकडे गुरांचे प्रमाण कमी झाल्याने व दुसरीकडे मागणी वाढत असल्याने शेणखताला चांगली किंमत मिळत आहे.

या तुटवड्यामुळे सद्यःस्थितीत शेणखताला 'सोनेरी दिवस' आल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी अन् पशुपालकांनाही आर्थिक उत्पन्न मिळू लागले आहे. खरीप हंगाम अवघ्या काही दिवसांवर आला. शेतकरी सध्या शेतमजुरांसह मशागतीच्या कामाला लागला आहे.

वाढलेल्या रासायनिक खतांच्या किंमती, चढ्या भावाने होणारी विक्री, वेळेवर न होणारा पुरवठा आदी कारणांमुळे परिसरातील शेतकरी शेणखताकडे वळले आहेत. पावसाळ्यापूर्वी शेतात शेणखत टाकण्यावरही अनेकांनी भर दिला आहे. रासायनिक खतापेक्षा शेणखत सरस आहे. याचा कोणताही दुष्परिणाम पिकांवर व जमिनीवर होत नाही. उत्पादनात मोठी वाढ होण्यासह जमिनीची सुपिकता टिकून जमिनीचा पोत सुधारत असल्याने परिसरातील शेतकरी शेणखत खरेदीसाठी धावपळ करीत आहेत.

शेणखत मिळविण्यासाठी धावपळ

परिसरातील बजाजनगर, वळदगाव, पाटोदा, वडगाव कोल्हाटी, रांजणगाव शेणपुंजी, पंढरपूर, सुलतानपूर शिवारातील हजारो एकर शेती विविध प्रकल्पांच्या नावाने शेतकऱ्यांच्या हातातून गेली.

## दादर स्थानकातील खाद्यपदार्थ स्टॉल बंद, प्रवासी हैराण!

● मुंबई, प्रतिनिधी:




मध्य रेल्वेच्या दादर रेल्वे स्थानकांवरील प्लॅटफॉर्म क्रमांक ९-१० वरील खाद्यपदार्थ स्टॉल बुधवारपासून (ता.२२) बंद करण्यात आले.

त्यामुळे भर उन्हाळ्यात प्रवाशांना पिण्याचा पाण्यासाठी रेल्वे स्थानकांवर वणवण फिरत असल्याचे चित्र दिसून आले. प्रवाशांना रेल्वे प्लॅटफॉर्मवर वापरण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध व्हावीत याकरिता खाद्यपदार्थ स्टॉल दुसरीकडे हलविण्यात येणार असल्याची माहिती मध्य रेल्वेकडून देण्यात आली. मुंबई शहरातील सर्वात गजबजलेले आणि गर्दी असणारे स्थानक अशी दादर रेल्वे स्थानकाची ओखळ आहे. कोणत्याही वेळेला दादर रेल्वे स्थानकावर गर्दी पहायला मिळते. मध्य रेल्वेच्या दादर स्थानकात उपनगरीय लोकलसह मेल-एक्स्प्रेसचे जंक्शन असल्याने दादर रेल्वे स्थानकात दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात.

त्यामुळे प्रवाशांची दादर स्थानकात नेहमीच गर्दी असतात. या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्य रेल्वेकडून प्लॅटरफॉर्ममध्ये काही सुधारणा करण्यात येत आहे. काही महिन्यापूर्वीच प्लॅटफॉर्म क्रमांक ८ ची रुंदी वाढविण्यात आली आहे. आता दादर स्थानकाचा प्लॅटफॉर्म ९ आणि १० च्या मध्यभागी असलेल्या खाद्यपदार्थ स्टॉल परेल ॲण्डला हलविण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच खाद्यपदार्थ स्टॉलधारकाना जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

वाढत्या तापणामुळे प्रवासी अगोदरच हैरान झाले आहेत. त्यात बुधवारी दादर रेल्वे स्थानकांचा प्लॅटफॉर्म ९-१० वरील खाद्यपदार्थ स्टॉल बंद झाल्याने प्रवाशांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण फिरवावे लागले आहे. तसेच प्रवाशांना रेल्वेच्या पाणपोईवर अवलंबून राहावे लागले आहे. खाद्यपदार्थ स्टॉल बंद करण्यापूर्वी पर्यायी स्टॉल उपलब्ध करून देणे गरजेचे होत अशी प्रतिक्रिया योगेश गोयेकर यांनी दिली.

### स्टॉल इथे नकोच -

रेल्वेने खाद्यपदार्थ स्टॉलधारकांसाठी उपलब्ध करून दिलेली जाग प्लॅटफॉर्म ९ आणि १० चा परेल ॲण्डला असून तिथे रेल्वेचे स्वच्छतागृह आहे. त्यामुळे खाद्यपदार्थ स्टॉल इथे नकोच असा सूर स्टॉलधारकांनी 'दैनिक सकाळ'कडे व्यक्त केला आहे.

### व्यवसायावर परिणाम होणार -

रेल्वेने उपलब्ध करून दिलेल्या जागेवर खाद्यपदार्थ स्टॉल सुरु झाल्यावर प्रवाशांना खाद्यपदार्थ घेण्यासाठी प्लॅटफॉर्म तुडवत जावे लागणार आहे. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होणार आहे. परंतु, खाद्यपदार्थ स्टॉलधारकांचा व्यवसाय कमी होण्याची भीती सुद्धा खाद्यपदार्थ स्टॉलधारकांनी सकाळकडे व्यक्त केली आहे. तसेच मध्य रेल्वेने प्लॅटफॉर्म क्रमांक आठवर खाद्यपदार्थ स्टॉल उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी खाद्यपदार्थ स्टॉलधारकांनी केली आहे.

### काय म्हणणे रेल्वे ?

प्रवाशांची वाढलेली गर्दी लक्षात घेऊन प्रवाशांच्या सोयीसाठी आणि जास्तीत जास्त जागा त्यांना वापरता यावी याकरिता प्लॅटफॉर्मच्या मध्यभागी असणाऱ्या सर्व स्टॉलना दुसऱ्या जागी शिफ्ट करण्यासाठी वारंवार नोटीस दिली गेली होती. यासाठी त्यांना रेल्वेकडून वेगळी जागा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. फेब्रुवारी महिन्यापासून रेल्वे प्रयत्नशील होती. मात्र आता सर्व स्टॉलधारकांच्या सहकार्याने या कामाला पूर्णत्वास नेण्यात येत असल्याची माहिती मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील नीला यांनी सकाळाला दिली.